रायगड, नवी मुंबई
# राम प्रहर
◆ वर्ष १९ ◆ अंक ७९
www.ramprahar.com
◆ मंगळवार, ६ ऑक्टोबर २०२६ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २

## अंतरंग
पनवेल-कर्जत रेल्वेमार्गाचे काम अंतिम टप्प्यात/३
सोनसाखळीसाठी खून करणाऱ्या दोघांना जन्मठेप/५
आशियाई विंडसर्फिंगमध्ये प्रियांशी पाटीलला 'कांस्य'/८

### भाजप युवा मोर्चाची नवी टीम; शंभवी साळे युवती प्रमुखपदी



**मुंबई :** युवा संघटन अधिक बळकट करण्यासाठी भारतीय जनता पक्षाने सोमवारी (दि.५) युवा मोर्चाची नवी प्रदेश कार्यकारिणी जाहीर केली. प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या सूचनेनुसार प्रदेश सरचिटणीस तथा युवा मोर्चा प्रभारी सुनील राणे आणि युवा मोर्चाचे प्रदेशाध्यक्ष कृष्णराज महाडिक यांनी २९ पदाधिकाऱ्यांची नियुक्ती जाहीर केली. विशेष म्हणजे या सर्व पदाधिकाऱ्यांचे वय ३५ वर्षांपेक्षा कमी आहे. नांदेडच्या २८ वर्षीय शंभवी साळे यांच्याकडे युवती प्रमुखपदाची जबाबदारी सोपविण्यात आली आहे. नव्या कार्यकारिणीत १० उपाध्यक्ष, चार महामंत्री, १० सचिव, कोषाध्यक्ष, सहकोषाध्यक्ष, कार्यालय प्रमुख, सामाजिक माध्यम प्रमुख आणि युवती प्रमुख अशा जबाबदाऱ्या देण्यात आल्या आहेत. पक्षाची ध्येयधोरणे आणि विविध उपक्रम तरुणांपर्यंत पोहचविण्यासह युवा संघटन अधिक बळकट करण्याची जबाबदारी या पदाधिकाऱ्यांवर असेल.

### सांस्कृतिक मंत्री ॲड. आशिष शेलार आज पनवेलमध्ये
# रौप्य महोत्सवी दिवाळी अंक स्पर्धेचा पारितोषिक वितरण सोहळा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

दिवाळी अंकांच्या समृद्ध परंपरेला प्रोत्साहन देणारे श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ आणि मुंबई मराठी पत्रकार संघाच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात येणाऱ्या राज्यस्तरीय व रायगड जिल्हास्तरीय दिवाळी अंक स्पर्धेने यंदा रौप्य महोत्सवी वर्षात पदार्पण केले आहे. या २५व्या दिवाळी अंक स्पर्धेचा भव्य पारितोषिक वितरण सोहळा मंगळवारी (दि. ६) सायंकाळी ४ वाजता पनवेल येथील आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात होणार आहे. यावेळी राज्याचे सांस्कृतिक मंत्री ॲड. आशिष शेलार यांच्या हस्ते विजेत्या दिवाळी अंकांना पारितोषिके प्रदान करून सन्मानित करण्यात येणार आहे.



माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अध्यक्षतेखाली होणाऱ्या या रौप्य महोत्सवी सोहळ्यास ९९व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष तथा सुप्रसिद्ध साहित्यिक विश्वास पाटील आणि प्रसिद्ध चरित्रलेखिका वीणा गवाणकर यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे.

गेल्या २५ वर्षांमध्ये या स्पर्धेच्या माध्यमातून राज्यभरातील दिवाळी अंकांना प्रोत्साहन देतानाच लेखक, साहित्यिक, संपादक आणि विविध कलावंतांच्या सर्जनशीलतेचा गौरव करण्यात आला आहे. रौप्य महोत्सवी वर्ष या प्रदीर्घ साहित्यिक प्रवासातील महत्त्वाचा टप्पा असून या निमित्ताने यंदाच्या स्पर्धेतील विजेत्यांचा विशेष सन्मान करण्यात येणार आहे.

मराठी साहित्य, कला, संस्कृती आणि वैचारिक परंपरेला समृद्ध करणाऱ्या दिवाळी अंकांच्या योगदानाचा सन्मान या सोहळ्यात करण्यात येणार असल्याने साहित्यप्रेमी, लेखक, पत्रकार, संपादक आणि दिवाळी अंक रसिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाचे अध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर, उपाध्यक्ष अरुणशेठ भगत, सचिव परेश ठाकूर, मुंबई मराठी पत्रकार संघाचे अध्यक्ष संदीप चव्हाण, कार्यवाह शैलेंद्र शिर्के आणि स्पर्धा समन्वयक दीपक म्हात्रे यांनी केले आहे.

**▌पुरस्कार प्राप्त दिवाळी अंक पान २ वर..**

# शासनाकडून पाण्याचे सूक्ष्म नियोजन
## ▌राज्यात १६ ऑक्टोबरपासून १०% पाणीकपात

**मुंबई : प्रतिनिधी**

अल निनोच्या प्रभावामुळे राज्यात यंदा पर्जन्यमानात मोठी घट झाली असून जलसाठा मर्यादित आहे. या संभाव्य दुष्काळसदृश परिस्थितीचा सामना करण्यासाठी जलसंपदा विभागाने ३१ ऑगस्ट २०२७पर्यंतचे पाण्याचे अत्यंत सूक्ष्म नियोजन केले आहे. राज्यातील नागरिकांना पिण्याच्या पाण्याची कोणतीही टंचाई भासू नये यासाठी येत्या १६ ऑक्टोबरपासून सर्व नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये किमान १०% पाणीकपात लागू करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत, अशी माहिती जलसंपदामंत्री (विदर्भ, तापी आणि कोकण खोरे विकास महामंडळ) गिरीश महाजन यांनी दिली.

खरीप हंगामातील ट्रिगर-१ लागू झालेल्या राज्यातील २६५ तालुक्यांमध्ये दुष्काळ जाहीर करण्यात आला आहे. पुढील वर्षापर्यंत अल निनोचा प्रभाव राहण्याची शक्यता लक्षात घेऊन जलसंपदा विभागाने सर्व संबंधित यंत्रणांना पाण्याचा अत्यंत काटकसरीने वापर करण्याचे आणि कठोर उपाययोजना राबवण्याचे स्पष्ट आदेश



दिल्याचे मंत्री महाजन यांनी सांगितले.

सर्व महानगरपालिका, नगरपालिका व ग्रामपंचायतींनी १६ ऑक्टोबरपासून १०% पाणीकपात लागू करावी. पाणीगळती रोखण्यासाठी विशेष मोहीम राबवावी तसेच सांडपाणी प्रक्रिया केंद्रे पूर्ण क्षमतेने चालवून प्रक्रिया केलेले पाणीच बागा, बांधकाम व धुलाईसाठी वापरावे.

पिण्याचे पाणी, जनावरे आणि चाऱ्याची गरज भागल्यानंतरच उर्वरित पाण्याचे सिंचनासाठी वाटप होईल. प्रथम रब्बी हंगामातील भुसार व चारा पिकांना, त्यानंतर इतर रब्बी पिकांना आणि पाणी शिल्लक राहिल्यासच बारमाही पिकांना मंजुरी दिली जाईल. पाणी बचत करणाऱ्या सिंचन पद्धतींवर भर दिला जाईल.

औद्योगिक क्षेत्रातील वापरासाठी किमान ३०% पाण्याचा पुनर्वापर करणे अनिवार्य करण्यात आले आहे. त्याचप्रमाणे धरणे, नद्या व कालव्यांमधून होणारा अनधिकृत पाणी उपसा तत्काळ रोखण्यासाठी महसूल, पोलीस व जलसंपदा विभागाची संयुक्त पथके गस्त घालतील. दोषींवर कारवाई करून बेकायदेशीर पंप व साहित्य जप्त केले जाणार आहे.

> *परिस्थितीवर मात करण्यासाठी जलसंपदा विभाग, महसूल, कृषी, उद्योग आणि नगरविकास विभाग पूर्ण समन्वयाने काम करत आहेत. पालकमंत्री आणि कालवा सल्लागार समित्यांच्या माध्यमातून पाण्याचा नियमित आढावा घेतला जाईल. आगामी वर्षातील पाण्याचे संकट टाळण्यासाठी नागरिकांनी आणि सर्व यंत्रणांनी पाण्याचा प्रत्येक थेंब जपून वापरावा आणि प्रशासनाला सहकार्य करावे.*
>
> **-गिरीश महाजन,** जलसंपदा मंत्री

### पिण्याच्या पाण्याला सर्वोच्च प्राधान्य

धरणे व जलाशयांमधील पाण्याचे नियोजन करताना पिण्याच्या पाण्याला प्रथम प्राधान्य दिले जाईल. बाष्पीभवन, गाळ व अनधिकृत उपसा विचारात घेऊन ३१ ऑगस्ट २०२७पर्यंत पिण्याचे पाणी आरक्षित ठेवले जाईल. याशिवाय भविष्यातील अनिश्चितता लक्षात घेऊन प्रत्येक धरणात १०% अतिरिक्त आपत्कालीन बफर साठा राखीव ठेवला जाईल. अत्यंत गरज भासल्यास तांत्रिक तपासणी करून मृतसाठ्यातील पाण्याचाही वापर केला जाईल.




# 'रयत'चा वर्धापन दिन उत्साहात
## संस्थेमधून नवे एकलव्य घडताहेत -संजय आवटे

**सातारा : प्रतिनिधी**

"बदलत्या युगात नवीन आव्हानांना सामोरे जात असताना १०७ वर्षांचा प्रदीर्घ वारसा असलेली रयत ही महत्त्वाची शिक्षण संस्था आहे. मन, मेंदू, मनगट यांचे एकात्म नाते असणारे विद्यार्थी घडवणे या काळात महत्त्वाचे आहे. कर्मवीरांच्या द्रष्ट्या व्यक्तिमत्त्वाचा वारसा पुढे घेऊन जाणे हीच आपली नैतिक जबाबदारी मानून आज 'रयत'मधून नवे एकलव्य घडत आहेत," असे प्रतिपादन विचारवंत, वक्ते, लेखक व संपादक संजय आवटे यांनी केले.

रयत शिक्षण संस्थेच्या १०७व्या वर्धापन दिन समारंभात प्रमुख पाहुणे म्हणून आवटे बोलत होते. अध्यक्षस्थानी संस्थेचे चेअरमन चंद्रकांत दळवी होते, तर संस्थेचे उपाध्यक्ष एम.बी. शेख, व्हाईस चेअरमन ॲड. भगीरथ शिंदे, संघटक डॉ. अनिल पाटील, कर्मवीर भाऊराव पाटील विद्यापीठाच्या कुलाधिकारी खासदार सुप्रिया सुळे, कुलगुरू डॉ. ज्ञानदेव म्हस्के, संस्थेचे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य लोकनेते रामशेठ ठाकूर, जे.के.जाधव, अजित पाटील आदी मान्यवर उपस्थित होते.

रयत शिक्षण संस्थेचे संघटक डॉ. अनिल पाटील यांनी संस्थेच्या वाटचालीत भरीव योगदान देणाऱ्या व्यक्तींच्या कार्याचा परिचय करून दिला. चेअरमन चंद्रकांत दळवी यांनी रयत शैक्षणिक गुणवत्ता विकास आराखड्याची भूमिका विषद केली. सचिव किशोर राजे-निंबाळकर यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. **(पान २ वर..)**

## निवडक

### मुंबईत ड्रग्जच्या ओव्हरडोसमुळे तरुणाचा मृत्यू; चौघे ताब्यात

**मुंबई :** मालाडच्या कुरार व्हिलेज येथील अप्पापाडा परिसरात २० वर्षीय अमन सोनी या तरुणाचा ड्रग्जच्या ओव्हरडोसमुळे संशयास्पद मृत्यू झाला आहे. मित्रांनी त्याला गार्डनमध्ये ड्रग्जची अनेक इंजेक्शन्स टोचल्याचा गंभीर आरोप अमनच्या कुटुंबीयांनी केला आहे. याप्रकरणी कुरार पोलिसांनी चार युवकांना ताब्यात घेतले असून अधिक तपास सुरू आहे.

### ज्ञानेश कुमारांना तातडीने हटवण्यास 'सर्वोच्च' नकार

**नवी दिल्ली :** एसआयआर प्रक्रियेवरून मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांना पदावरून हटवण्याच्या निर्णयावर तातडीने आदेश देण्यास सर्वोच्च न्यायालयाने सोमवारी (दि.५) नकार दिला, तथापि नोटिसीद्वारे उत्तर मागविले आहे.

# खांदेश्वरी माऊली नवरात्रोत्सवाची धूम

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

खांदेश्वर परिसरातील नागरिकांसाठी यंदाचा नवरात्रोत्सव भक्ती, संस्कृती आणि मनोरंजनाचा अनोखा संगम ठरणार आहे. जय हनुमान सामाजिक सांस्कृतिक विकास मंडळ मोठा खांदा आणि पारनेरकर रहिवासी संघ यांच्या संयुक्त विद्यमाने तसेच भारतीय जनता पक्षाच्या पुढाकाराने खांदेश्वरी माऊली सार्वजनिक नवरात्र उत्सव २०२६चे आयोजन करण्यात आले आहे.

११ ते २० ऑक्टोबर या कालावधीत खांदेश्वर रेल्वे स्थानकासमोर, अक्षर सोसायटीजवळ, प्लॉट क्रमांक २७, सेक्टर २५ येथे हा उत्सव मोठ्या उत्साहात साजरा होणार आहे. या

### आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते पोस्टरचे प्रकाशन




उत्सवाच्या पोस्टरचे प्रकाशन भाजपचे महाराष्ट्र प्रदेश चिटणीस आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी भाजप ओबीसी मोर्चाचे पनवेल शहराध्यक्ष तथा मुख्य आयोजक सतीश दत्ता पाटील, पारनेरकर रहिवासी संघाचे अध्यक्ष भाऊ पावडे, सचिव कृष्णा ढोमे, माजी नगरसेविका सारिका भगत, नगरसेवक सुमित झुंजारराव, भाजप उत्तर रायगड जिल्हा उपाध्यक्ष मयुरेश नेतकर, भाजपचे स्थानिक नेते मोतीलाल कोळी, माजी नगरसेवक महेंद्र कावळे, अक्षय मगर, शुभम वाफारे यांच्यासह भाजपचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि उत्सव आयोजन समितीचे सदस्य उपस्थित होते.

**पहिल्याच वर्षी भव्य आयोजन**

खांदेश्वरी माऊली सार्वजनिक नवरात्रोत्सवाचे यंदा पहिलेच वर्ष आहे. पहिल्याच वर्षी उत्सव भव्य स्वरूपात साजरा करण्याचा संकल्प आयोजकांनी केला आहे. धार्मिक कार्यक्रमांबरोबरच सामाजिक आणि सांस्कृतिक उपक्रमांनाही महत्त्व देण्यात आले आहे. त्यामुळे येथील नागरिकांसाठी हा उत्सव आकर्षणाचा केंद्रबिंदू ठरणार आहे. **(पान २ वर..)**

# केंद्राकडून महागाई भत्त्यात वाढ



**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

केंद्र सरकारने कृषी, बांधकाम, देखभाल तसेच रस्ते आणि इमारतींशी संबंधित कामांमध्ये कार्यरत कामगारांच्या महागाई भत्त्यात (डीए) वाढ केली आहे. ही वाढ १ ऑक्टोबरपासून लागू झाली आहे. महागाई भत्त्यातील वाढीमुळे वेगवेगळ्या श्रेणीतल्या कामगारांच्या बेसिक सॅलरीत वाढ झाली आहे.

कामगारांचे वेतन त्यांच्या कौशल्याच्या पातळीबरोबरच एरिया अ, ब आणि क या क्षेत्रांनुसार निश्चित करण्यात आले आहे. त्यामुळे वेगवेगळ्या भागांमध्ये काम करणाऱ्या कामगारांना वेगवेगळी बेसिक सॅलरी मिळणार आहे.

बांधकाम आणि देखभाल क्षेत्रातील कामगारांसाठीही नवीन दर लागू झाले आहेत. रस्ते, रनवे, इमारती, वीज व कम्युनिकेशनच्या भूमिगत केबल्स, पाणी पाइपलाइन आणि सीवर लाइन यांसारख्या कामांचा यामध्ये समावेश आहे.

महागाई भत्ता हा वाढत्या जीवनावश्यक खर्चाचा परिणाम कमी करण्यासाठी वेतनात दिला जाणारा घटक आहे. सरकार औद्योगिक कामगारांच्या ग्राहक किंमत निर्देशांकावर आधारित त्याचे पुनरावलोकन करते. यावेळी निर्देशांक ४२४.८०वरून ४३१.४२ झाला असून ६.६२ अंकांची वाढ झाल्याच्या आधारावर १ ऑक्टोबरपासून सुधारित महागाई भत्ता लागू करण्यात आला आहे.

# दिवाळी अंक स्पर्धेची २५ वर्षांतील उत्तुंग भरारी!

***एखादा सामाजिक, सांस्कृतिक वा साहित्यिक उपक्रम सुरू केला की, तो सातत्याने चालू ठेवण्यासाठी त्यामागे कार्यकर्त्यांच्या जिद्दीबरोबरच कुणाचे तरी आशीर्वाद आणि पाठबळ लागते, तेव्हा तो उपक्रम अखंडपणे सुरू राहतो.***



श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ आणि मुंबई मराठी पत्रकार संघ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या राज्यस्तरीय दिवाळी अंक स्पर्धेचा रौप्य महोत्सवी बक्षीस वितरण समारंभ आज पनवेलमध्ये होत आहे. या रौप्य महोत्सवी वर्षात स्पर्धेने महाराष्ट्रात नावलौकिक मिळवला आहे. म्हणूनच स्पर्धेला महाराष्ट्राच्या अनेक जिल्ह्यांतून अतिशय उत्तम प्रतिसाद मिळत आहे. यामागे लोकनेते रामशेठ ठाकूर यांचे पाठबळ आणि

**दीपक म्हात्रे,**
**ज्येष्ठ पत्रकार तथा दिवाळी अंक स्पर्धा समन्वयक**

आशीर्वाद तसेच आमदार प्रशांत ठाकूर यांचे सुनियोजित पद्धतीने केलेले आयोजन आणि त्याला मुंबई मराठी पत्रकार संघाचे मिळालेले मौल्यवान सहकार्य या गोष्टी कारणीभूत आहेत.

खरंतर दिवाळी हा हिंदू धर्मातील सणांमध्ये अतिशय आनंदी आणि उत्साही सण म्हणून ओळखला जातो. हा सण आपण नेहमीच आनंदाने आणि उत्साहाने साजरा करीत असतो. या सणाच्या निमित्ताने मराठी भाषेत शेकडो दिवाळी अंक वाचकांच्या भेटीला येत असतात. त्यामुळे वाचकांचेही मनोरंजन होऊन त्यांचा दिवाळी सणाचा आनंद द्विगुणित होतो.

पहिला दिवाळी अंक १९०९ साली काशिनाथ रघुनाथ मित्र उर्फ का.र. मित्र यांनी काढला. त्यानंतर अनेक जणांनी दिवाळी अंक काढण्याचा प्रयत्न केला. आज शेकडो दिवाळी अंक निघतात. त्यामुळे का.र. मित्र यांनी सुरू केलेली साहित्यिक परंपरा आजही अखंडपणे सुरू आहे. ही साहित्यिक परंपरा अधिक समृद्ध व्हावी व वाचकांना सकस साहित्य वाचायला मिळावे हा तत्कालीन खासदार रामशेठ ठाकूर यांचा ध्यास होता. मराठी भाषेबद्दल त्यांना विशेष प्रेम आहे. मराठी साहित्याची त्यांना आवड व आस्था आहे. म्हणूनच त्यांनी श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाच्या वतीने सन २००१मध्ये सर्वोत्कृष्ट दिवाळी अंक स्पर्धा सुरू केली. **(पान २ वर..)**



# आत्मविश्वासाने जीवनाला सामोरे जा -लोकनेते रामशेठ ठाकूर

**सातारा : रामप्रहर वृत्त**

आपण काही वाईट करत नसाल तर घाबरण्याचे कारण नाही; बिनधास्त जगा आणि बिनधास्त बोला. 'घाबरला तो संपला', त्यामुळे चिंता करत बसण्यापेक्षा आत्मविश्वासाने जीवनाला सामोरे जा, असा संदेश रयत शिक्षण संस्थेचे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य, लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी दिला. कर्मवीर भाऊराव पाटील विद्यापीठाशी संलग्न छत्रपती शिवाजी कॉलेज, सातारा येथे त्यांच्या हस्ते छत्रपती शिवाजी कॉलेजच्या मराठी विभागातील माजी विद्यार्थी व त्यांचे मित्र शंकरराव पायमल यांच्या 'हिंदोळा' आत्मचरित्राचे प्रकाशन झाले, त्यावेळी ते बोलत होते.

यावेळी रयत शिक्षण संस्थेचे सहसचिव डॉ. शिवलिंग मेनकुदळे, सहसचिव प्राचार्य डॉ. राजेंद्र मोरे, प्रताप भोसले. मराठी विभागाचे माजी विभागप्रमुख प्रा. डॉ. सुभाष वाघमारे,



## शंकरराव पायमल यांच्या 'हिंदोळा' आत्मचरित्राचे प्रकाशन

रयत शिक्षण संस्थेच्या मॅनेजिंग कौन्सिलचे सदस्य शहाजी डोंगरे, डॉ. धनंजय नलावडे, बाळासाहेब कारंडे आदी मान्यवर उपस्थित होते.

पायमल यांनी मन आनंदी ठेवून सर्जनशीलतेचा प्रवास सुरू ठेवावा, असे सांगत लोकनेते ठाकूर पुढे म्हणाले की, विद्यार्थी जीवनापासून पायमल अभ्यासू, शिस्तप्रिय, साध्या राहणीचे आणि सज्जन स्वभावाचे होते. त्यांचे वळणदार हस्ताक्षर हेवा वाटावे असे होते आणि त्यांच्यातील साहित्यिक वृत्ती तेव्हाच जाणवत होती. प्रतिकूल परिस्थितीत शिक्षण घेऊन विविध ठिकाणी आनंदाने सेवा बजावणाऱ्या पायमल यांच्या लेखनात जीवनातील कष्ट आणि गावाची ओढ प्रतिबिंबित होते. माणूस नोकरी–व्यवसायासाठी कुठेही गेला, आर्थिक प्रगती केली, तरी मनाने गावाशी जोडलेला राहतो. मुखपृष्ठावरील गाव, देऊळ आणि शाळेचे चित्रही हेच भावविश्व व्यक्त करते. पत्नी आणि मुलांची समर्थ साथ लाभली असल्याने त्यांनी चिंता सोडून आणखी लिहावे आणि वय वाढले तरी उत्साह टिकवावा. शिक्षणानंतर आपापल्या वाटा वेगळ्या झाल्या, तरी संवाद आणि स्नेहामुळे आपली मैत्री अखंड राहिल्याचे सांगत लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी एकाच बाकावर बसून शिकतानाच्या आणि पायमल यांच्या सेवापूर्तीच्या कार्यक्रमाच्या आठवणींना उजाळा दिला.

कर्मवीर अण्णांनी उभारलेले छत्रपती शिवाजी कॉलेज आपल्यासाठी पंढरीसारखे असून येथे आल्यावर घरी आल्याचा आनंद मिळतो आणि चिंता दूर होतात, अशी भावना त्यांनी व्यक्त केली. पायमल यांच्या लेखनाला आणखी बहर यावा, अशी अपेक्षा व्यक्त करत कुटुंबीयांच्या उपस्थितीत मित्राच्या आत्मचरित्राचे प्रकाशन करणे हे आपले भाग्य असल्याचे त्यांनी सांगितले.

प्राचार्य डॉ. राजेंद्र मोरे यांनी आत्मचरित्रातील ओघवत्या भाषेचे आणि वास्तववादी चित्रणाचे कौतुक केले. संस्थेचे सहसचिव प्राचार्य डॉ. शिवलिंग मेनकुदळे यांनी आत्मचरित्रातील प्रामाणिकपणाचा गौरव केला. आत्मप्रौढीचा दोष टाळून स्वतःच्या जीवनप्रवासाकडे तटस्थ बुद्धीने पाहण्याचे कठीण काम पायमल यांनी साधले आहे, असे त्यांनी सांगितले. विविध शाखांमध्ये सेवा बजावताना त्यांनी कर्मवीरांच्या विचारांशी राखलेली एकनिष्ठा प्रेरणादायी आहे. हा १८३ पानांचा ग्रंथ रयत सेवकांना काम करण्याची ऊर्जा देणारा आणि विद्यार्थ्यांवर मूल्यांचे संस्कार करणारा असल्याचे त्यांनी नमूद केले.

आपल्या मनोगतात शंकरराव पायमल यांनी 'हिंदोळा' या शीर्षकामागील भूमिका स्पष्ट केली. 'हिंदोळा' म्हणजे केवळ झोपाळा नव्हे, तर आयुष्यातील हेलकाव्यांतून आलेल्या जागृतीमुळे पुन्हा चूक होऊ नये म्हणून घेतलेली खबरदारी होय, असे त्यांनी सांगितले. ३३ वर्षांच्या सेवाकाळात १३ शाखांमध्ये शिक्षक म्हणून लाभलेले समृद्ध अनुभव आत्मचरित्रात प्रामाणिकपणे मांडल्याचे त्यांनी नमूद केले. लोकांच्या सुखात भर घालण्यासाठी 'पुन्हा नभाला लाल कडा' हा कथासंग्रह लिहिण्याचा विचार त्यांनी व्यक्त केला. यावेळी त्यांनी लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्यावर रचलेली 'रामपर्व' ही कविता सादर केली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. सर्जेराव लुगडे यांनी केले. सेवानिवृत्त रयत सेवक शंकर पोतेकर यांनी अतिथींचा परिचय करून दिला. प्रा. डॉ. संदीप किर्दत यांनी सूत्रसंचालन केले, तर प्रा. डॉ. सविता मेनकुदळे यांनी आभार मानले. संस्थेचे, प्राचार्य, प्राध्यापक, अधिकारी, माजी विद्यार्थी, पायमल यांचे कुटुंबीय, सहकारी, नातेवाईक आणि ग्रामस्थ यांनीही सोहळ्यास उपस्थिती लावली.

# भाजप खालापूर तालुका महिला मोर्चातर्फे अंगणवाडी सेविकांचा सन्मान



**खालापूर : रामप्रहर वृत्त**

खालापूर तालुका भारतीय जनता पार्टी महिला मोर्चाच्या वतीने आयोजित करण्यात आलेले सेवा संकल्प अभियान खालापूर तालुक्यात मोठ्या उत्साहात झाले.

या अभियानाच्या सांगता समारंभाच्या निमित्ताने खालापूर तालुका महिला मोर्चाच्या माध्यमातून डोनवत, डोनवत ठाकूरवाडी आणि नवघर येथील अंगणवाडी केंद्रांमध्ये विशेष कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमादरम्यान अंगणवाडीतील लहान विद्यार्थ्यांना खाऊ आणि शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले.

लहान मुलांवर योग्य संस्कार घडवण्यात आणि त्यांच्या आरोग्याची काळजी घेण्यात अंगणवाडी सेविका व मदतनीस यांचे योगदान अत्यंत मोलाचे असते. याच कृतज्ञतेतून अंगणवाडी सेविका आणि मदतनिसांचा सन्मान करण्यात आला. यावेळी महिला मोर्चा तालुका अध्यक्ष श्वेता मनवे, माजी तालुका अध्यक्ष सुजाता दळवी, उपाध्यक्ष निकिता हेलांडे, विशाखा देशमुख, काजल देशमुख, नीलिमा देशमुख, भावना देशमुख, रोहिणी चौधरी, पलक देशमुख, चेतना गायकवाड, सुवर्णा गायकवाड आदी महिला पदाधिकारी, कार्यकर्त्या उपस्थित होत्या.

पान १ वरुन

## रौप्य महोत्सवी दिवाळी अंक स्पर्धेचा पारितोषिक वितरण सोहळा

**पुरस्कार प्राप्त दिवाळी अंक**

**राज्यस्तरीय स्पर्धा**

प्रथम क्रमांक : 'दीपावली' संपादक अशोक कोठावळे ₹१ लाख, द्वितीय क्रमांक : 'मुक्त संवाद' संपादक विवेक कोरडे ₹५० हजार, तृतीय क्रमांक (संयुक्त) : 'वसा' संपादक सई पवार आणि 'अक्षरलिपी' संपादक शर्मिष्ठा भोसले एकत्रित पारितोषिक ₹३० हजार.

**राज्यस्तरीय विशेष पुरस्कार**

लक्षवेधी उत्कृष्ट अंक : 'बाईमाणूस' संपादक प्रशांत पवार ₹१५ हजार, उत्कृष्ट कथा : 'धनंजय'मधील 'आवाज' लेखिका मनस्विनी लता रवींद्र ₹७ हजार, उत्कृष्ट लेख : 'ललित'मधील 'टॉलस्टॉयची सायकल' लेखक डॉ. नंदू मुलमुळे ₹५ हजार, उत्कृष्ट कविता : 'युगांतर'मधील 'त्याने तिरंगा पाहिला' कवी सतीश लोले ₹५ हजार, उत्कृष्ट विशेषांक : 'नवभारत' संपादक निरंजन हातेकर ₹१५ हजार, उत्कृष्ट बाल दिवाळी अंक : 'मुलांचे मासिक' संपादक जयंत मोडक ₹७,५००, लक्षवेधी परिसंवाद : 'अक्षर'मधील 'युद्धकांड' मीना कर्णिक व हेमंत कर्णिक ₹५ हजार, लक्षवेधी मुलाखत : 'शब्दांगण'मधील आसाराम लोमटे यांची मुलाखत मुलाखतकार मनिषा उगले ₹५ हजार, सर्वोत्कृष्ट मुखपृष्ठ : 'साप्ताहिक विवेक' चित्रकार विनायक खरात ₹५ हजार, सर्वोत्कृष्ट व्यंगचित्र : ज्ञानेश बेलेकर ₹५ हजार.

**रायगड जिल्हास्तरीय स्पर्धा**

प्रथम क्रमांक : 'इंद्रधनू' संपादक विजय पवार ₹४० हजार, द्वितीय क्रमांक : 'आगरी दर्पण' संपादक दीपक म्हात्रे ₹२० हजार, तृतीय क्रमांक : 'शब्दसंवाद' संपादक विनोद साळवी ₹१० हजार, उत्तेजनार्थ : 'रसायनी टाइम्स' संपादक अनिल भोळे ₹५ हजार, उत्तेजनार्थ : 'पनवेल टाइम्स' संपादक गणेश कोळी ₹५ हजार.

**रायगड जिल्हास्तरीय साहित्य पुरस्कार**

उत्कृष्ट कथा : 'आगरी दर्पण'मधील 'गॉटर' लेखक किरण शेले ₹३ हजार, उत्कृष्ट लेख : 'श्री समर्थ विचार'मधील 'ग्रामीण आरोग्य व्यवस्थेची दुर्दशा' लेखक अरविंद पाशिलकर ₹३ हजार, उत्कृष्ट कविता : 'म्हसळा टाइम्स'मधील 'चाळ' कवयित्री कविता झुंजारराव ₹३ हजार.

## 'रयत'चा वर्धापन दिन उत्साहात

यावेळी रयत शैक्षणिक गुणवत्ता विकास आराखड्याचे चित्रफितीच्या माध्यमातून अनावरण करण्यात आले. यशवंतराव चव्हाण इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स, सातारा या महाविद्यालयतील विद्यार्थी साहिल जाधव याने आशियाई क्रीडा स्पर्धेत तिरंदाजीमध्ये सुवर्णपदक पटकावले. त्याबद्दल संस्थेच्या वतीने त्याच्या पालकांचा सन्मान करण्यात आला.

संस्थेच्या वाटचालीत भरीव योगदान देणाऱ्या व्यक्तींच्या स्मरणार्थ आदर्श विभाग, उपक्रमशील शाखा, उपक्रमशील शिक्षक, लाईफ वर्कर, लाईफ मेंबर, प्राचार्य, आदर्श स्वायत्त महाविद्यालये, आदर्श विद्यार्थी, विद्यार्थिनी, विज्ञान शिक्षक, कार्यक्षम गुरुकुल प्रमुख इत्यादी पुरस्कार देण्यात आले. क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले राज्य शिक्षक गुणगौरव पुरस्कार प्राप्त शिक्षिकेचा सत्कार करण्यात आला. सूत्रसंचालन डॉ. सविता मेनकुदळे यांनी केले, तर माध्यमिक विभागाचे सहसचिव बी.एन. पवार यांनी पुरस्कारांचे वाचन केले.

कार्यक्रमास उच्च शिक्षण विभागाचे सहसचिव प्राचार्य डॉ. शिवलिंग मेनकुदळे, ऑडिट विभागाचे सहसचिव प्राचार्य डॉ. राजेंद्र मोरे, ॲड. दिलावर मुल्ला यांच्यासह संस्थेचे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य, जनरल बॉडी सदस्य, कर्मवीर कुटुंबीय, आजीव सभासद, आजीव सेवक, विविध शाखांचे शाखाप्रमुख, प्राध्यापक, शिक्षक, विद्यार्थी, शिक्षणप्रेमी नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. सहसचिव प्राचार्य डॉ. मेनकुदळे यांनी उपस्थितांचे आभार मानले.

## खांदेश्वरी माऊली नवरात्रोत्सवाची धूम

नवरात्रोत्सवाच्या माध्यमातून नागरिकांनी एकत्र यावे, विविध कलागुणांना व्यासपीठ मिळावे आणि नव्या पिढीला भारतीय संस्कृती व परंपरेशी जोडता यावे या उद्देशाने विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

**रास–दांडियाची विशेष रंगत**

उत्सवातील भव्य रास–दांडिया स्पर्धा हे प्रमुख आकर्षण ठरणार आहे. पनवेल परिसरामध्ये सर्वाधिक बक्षिसांची लयलूट करणारी रास–दांडिया स्पर्धा आयोजित करण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. यामुळे तरुणाईमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले असून महिला, युवक आणि कुटुंबीय मोठ्या संख्येने सहभागी होण्याची शक्यता आहे.

रास–दांडियासाठी विविध आकर्षक बक्षिसे ठेवण्यात आली आहेत. उत्कृष्ट सादरीकरण करणाऱ्या सहभागी आणि संघांना गौरविण्यात येणार असल्याने या स्पर्धेला चांगला प्रतिसाद मिळेल, अशी अपेक्षा आयोजकांनी व्यक्त केली आहे.

**लहानांपासून मोठ्यांपर्यंत सर्वांसाठी स्पर्धा**

नवरात्रोत्सवात केवळ रास–दांडियाच नव्हे, तर विविध वयोगटातील नागरिकांना सहभागी करून घेण्यासाठी अनेक स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे. यामध्ये फॅन्सी ड्रेस स्पर्धा, चित्रकला स्पर्धा आणि रील स्पर्धेचा समावेश आहे. बालकांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी फॅन्सी ड्रेस आणि चित्रकला स्पर्धा घेण्यात येणार आहेत. तरुणाईच्या सर्जनशीलतेला व्यासपीठ मिळावे यासाठी रील स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. याशिवाय थेट खाद्य व वस्तूंचे स्टॉलही उत्सवाच्या ठिकाणी उपलब्ध असणार आहेत. त्यामुळे कुटुंबासह उत्सवाचा आनंद घेण्यासाठी नागरिकांना विविध पर्याय उपलब्ध होणार आहेत.

**धार्मिकतेला सांस्कृतिक अधिष्ठान!**

घटस्थापनेपासून महाराष्ट्रासह संपूर्ण देशात नवरात्रोत्सव मोठ्या भक्तिभावाने साजरा केला जातो. नऊ दिवस देवीची आराधना, पूजा–अर्चा आणि विविध धार्मिक कार्यक्रम केले जातात. काळानुसार या उत्सवाला सामाजिक आणि सांस्कृतिक स्वरूपही प्राप्त झाले आहे. याच पार्श्वभूमीवर खांदेश्वरमध्ये आयोजित करण्यात आलेल्या नवरात्रोत्सवात अध्यात्मिक आणि धार्मिक वातावरणासोबतच सांस्कृतिक कार्यक्रमांनाही प्राधान्य देण्यात आले आहे. नागरिकांनी एकत्र येऊन उत्सवाचा आनंद घ्यावा आणि सामाजिक एकोपा अधिक दृढ व्हावा हा या आयोजनामागील उद्देश असल्याचे आयोजकांनी सांगितले.

## दिवाळी अंक स्पर्धेची २५ वर्षांतील उत्तुंग भरारी!

सुरुवातीला ही स्पर्धा रायगड जिल्ह्यापुरती मर्यादित होती, परंतु नंतर पहिल्या स्पर्धेच्या बक्षीस वितरण समारंभाला प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित असलेले संपादक एस.एम. देशमुख व अनेकांच्या विनंतीवरून लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी ही स्पर्धा राज्यस्तरीय केली, पण रायगड जिल्ह्यासाठी घेण्यात येणारी स्पर्धा तशीच सुरू ठेवली.

सुरुवातीला या स्पर्धेचे पहिले पारितोषिक रु.२५,००० होते, पण स्पर्धेला महाराष्ट्रातून मिळत असलेला वाढता प्रतिसाद पाहता ते पहिले पारितोषिक २०१० साली रु.५०,००० केले गेले. या पारितोषिकात वाढ केल्यानंतर त्याचा पहिला मानकरी ठरला तो राजेंद्र कुलकर्णी संपादित धनंजय दिवाळी अंक हा होय.

या स्पर्धेसाठी महाराष्ट्राच्या विविध जिल्ह्यांतून अनेक दिवाळी अंक आज येत असतात. त्यात पुणे, नाशिक, बीड, नांदेड, अमरावती, औरंगाबाद, कोल्हापूर आदी जिल्ह्यांसह गोवा राज्यातूनही अंक येतात, इतकी ही स्पर्धा लोकप्रिय झाली आहे.

या स्पर्धेची लोकप्रियता दिवसेंदिवस इतकी वाढते आहे की, साधारपणे २२५ ते २५० अंक स्पर्धेला येत असतात. ही संख्या दरवर्षी वाढतच जात आहे. त्यामुळे त्यांचे नियोजन करून परीक्षक नेमणे, ते अंक परीक्षकांकडे वेळेवर पोहचले पाहिजेत हे पाहणे, त्यांना परीक्षणाची अंतिम मुदत देणे, त्यांच्याकडून आलेले परीक्षण वरिष्ठांना दाखवणे आणि तो निकाल वार्ताहर परिषद घेऊन जाहीर करणे ही सारी कामे गेली अनेक वर्षे मी स्वतः आणि ज्येष्ठ पत्रकार नीला उपाध्ये पाहात आलो आहोत. या कामी श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाचे अध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांचे अतिशय मोलाचे सहकार्य व योगदान लाभले आहे. विशेषतः पारितोषिक वितरणाचा कार्यक्रम ठरवताना त्यांची विशेष मदत होते. ही स्पर्धा आणखी लोकप्रिय व्हावी, तिला सर्वाधिक प्रतिसाद मिळावा, असा प्रयत्न आम्ही सर्वजण करीत होतो.

दरम्यान, २०१४ साली मुंबई मराठी पत्रकार संघाचे तत्कालीन अध्यक्ष देवदास मटाले यांच्याशी या संदर्भात चर्चा करताना ही स्पर्धा मुंबई मराठी पत्रकार संघ आणि श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाच्या संयुक्त विद्यमाने आयोजित केली जाऊ शकते का? असे विचारताच त्यांनी लगेच यावर सकारात्मक प्रतिसाद दिला. त्यानंतर लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्याशी बोलणे झाले. आमदार प्रशांत ठाकूर यांनाही याची कल्पना दिली. दोघांनीही याला मान्यता दिली. पुढे मुंबई मराठी पत्रकार संघाचे श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाला ही दिवाळी अंक स्पर्धा संयुक्तपणे घेण्याचे विनंती पत्र देण्यात आले आणि १९ मार्च २०१५ रोजी देवदास मटाले अध्यक्ष असताना पहिला संयुक्त बक्षीस वितरण समारंभाचा कार्यक्रम मुंबई मराठी पत्रकार संघाच्या सभागृहात लोकनेते रामशेठ ठाकूर, ज्येष्ठ साहित्यिक सदानंद मोरे यांच्या प्रमुख उपस्थितीत




साजरा करण्यात आला. त्या वर्षापासून गेली ११ वर्षे ही स्पर्धा दोन संस्थांच्या संयुक्त विद्यमाने घेण्यात येते. त्यानंतर झालेले अध्यक्ष नरेंद्र वाबळे यांनीही या स्पर्धेसाठी आपुलकीने लक्ष घातले.

आज या स्पर्धेला मुंबई मराठी पत्रकार संघाचे अतिशय उत्तम सहकार्य लाभत आहे. त्यांचे पदाधिकारी आपुलकीने काम करताना दिसतात. सध्याचे अध्यक्ष संदीप चव्हाण आणि सचिव शैलेंद्र शिर्के हे या स्पर्धेकडे जातीने लक्ष घालत आहेत.

२०१६ साली या स्पर्धेला वाढता प्रतिसाद पाहता लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी या स्पर्धेचे पहिले पारितोषिक रु.७५,००० केले. त्यामुळे महाराष्ट्रातील सर्वाधिक रकमेची पारितोषिके देणारी ही स्पर्धा ठरली आणि दिवाळी अंकाचे संपादक हौसेने व एका आशेने या स्पर्धेत भाग घेऊ लागले. तसे पाहता महाराष्ट्रात अनेक संस्था दिवाळी अंक स्पर्धा घेतात, पण त्या स्पर्धांच्या बक्षिसांची रक्कम मर्यादित असते. त्यामुळे दिवाळी अंकांचा ओढा या स्पर्धेकडे जास्त असतो. शिवाय मुंबई मराठी पत्रकार संघाचे नाव असल्याने या स्पर्धेची प्रतिष्ठा वाढली आहे. अर्थात पहिल्या बक्षिसाच्या वाढीव रकमेच्या पारितोषिकाचा पहिला मान २०१६ साली ह.ल. निपुणगे यांच्या विशाखा या दिवाळी अंकाने मिळवला.

लोकनेते रामशेठ ठाकूर यांची या दिवाळी अंकाच्या निमित्ताने साहित्यिकांशी निर्माण झालेली बांधिलकी व ऋणानुबंध इतके घट्ट झाले की, २०२२ साली त्यांनी या स्पर्धेचे पहिले पारितोषिक वाढवून ते रु.एक लाखांचे केले. म्हणजे स्पर्धा सुरू केल्यापासून ही पहिल्या बक्षिसात केलेली तिसरी वाढ आहे. अर्थात, कोणताही उपक्रम हाती घेतला की तो भव्यदिव्य, नीटनेटका, लोकाभिमुख असावा असा त्यांचा अट्टाहास असतो. हा अट्टाहास त्यांनी या स्पर्धेसाठीही अगदी मनमोकळेपणाने दाखवला. त्यांच्या या दिलदारपणाचे कौतुक करावे तेवढे थोडेच आहे.

आजवर या स्पर्धेच्या पारितोषिक वितरण समारंभाला अनेक ज्येष्ठ साहित्यिकांनी उपस्थित राहून मोलाचे मार्गदर्शन केले. त्यात ज्येष्ठ कवी मंगेश पाडगावकर, विश्वास पाटील, रामदास फुटाणे, अरुण साधू, आनंद अंतरकर, नागनाथ कोत्तापल्ले, द.भि. कुलकर्णी, सदानंद मोरे, ह.मो. मराठे, फ.मु. शिंदे, प्रवीण दवणे, दिनकर गांगल, लक्ष्मीकांत देशमुख, रामदास भटकळ, दिलीप पांढरपट्टे, रविप्रकाश कुलकर्णी, डॉ. रवींद्र शोभणे, कवयित्री नीरजा, डॉ.रवींद्र शिसवे, अरुण शेवते यांचा समावेश आहे, तर अनेक ज्येष्ठ पत्रकारही समारंभाला प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. त्यात मधुकर भावे, विजय कुवळेकर, राजीव खांडेकर, एस.एम. देशमुख, विजय पाटील, नितीन केळकर, देवदास मटाले, नरेंद्र वाबळे याव्यतिरिक्त अरुण गुजराथी, जे.एम, म्हात्रे, आमदार मधुकर ठाकूर, आमदार उल्हास पवार, गिरीश गांधी असे दिग्गज राजकारणी उपस्थित होते. या सर्वांनी वेळोवेळी योग्य मार्गदर्शन करून या स्पर्धेला शुभेच्छा देत स्पर्धेचे आश्रयदाते लोकनेते रामशेठ ठाकूर आणि आमदार प्रशांत ठाकूर यांच्या सुनियोजित आयोजनाचे कौतुक केले.

२०१६ साली झालेल्या पारितोषिक वितरण समारंभाला उपस्थित असलेले ज्येष्ठ संपादक विजय कुवळेकर यांनी मार्गदर्शन करताना सांगितले की, दिवाळी अंकात काही चांगल्या कथा, कविता, लेख येतात. हे चांगले साहित्य वाचकांना नेहमी वाचायला मिळावे, ते पुस्तक रूपाने प्रसिद्ध व्हावे यासाठी श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाने पुढाकार घ्यावा. त्यांना ते सहज शक्य आहे, अशी विनंती केली.

विजय कुवळेकर यांची ही सूचना आम्ही अमलात आणायचे ठरवले आणि २०१७मधील दिवाळी अंकातील उत्तम कथा परीक्षकांनी निवडल्या. त्याचे योग्य ते संपादन मी स्वतः केले आणि "थेंब अमृताचे" नावाचे पुस्तक उदयाला आले. या पुस्तकाचे प्रकाशन २०१८ मध्ये झालेल्या बक्षीस समारंभात लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते दिनकर गांगल, कवी प्रवीण दवणे यांच्या उपस्थितीत पनवेल येथील सीकेटी महाविद्यालयात करण्यात आले. हे पुस्तक मुंबई, नवी मुंबईतील अनेक सार्वजनिक वाचनालयांना सप्रेम भेट म्हणून देण्यात आले. त्यामुळे अनेक वाचकांनी या उपक्रमाचे स्वागत केले. पुढे हा उपक्रम कोविडमुळे मागे पडला.

आज ही स्पर्धा मुंबई मराठी पत्रकार संघाच्या सहकार्याने दिमाखात सुरू आहे. यावर्षी २५व्या राज्यस्तरीय स्पर्धेचा पारितोषिक वितरण समारंभ नेहमीच्या उत्साहात आज क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अध्यक्षतेखाली साजरा होत आहे. या समारंभाला प्रमुख अतिथी म्हणून सांस्कृतिक कार्यमंत्री ना. आशिष शेलार आणि ९९व्या अ.भा. मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष विश्वास पाटील उपस्थित राहणार आहेत. अशा प्रकारे या स्पर्धेने गेल्या २५ वर्षांत महाराष्ट्रात बराच नावलौकिक मिळवला. महाराष्ट्राच्या अनेक जिल्ह्यांत या स्पर्धेची चर्चा सुरू झाली आणि अनेक दिवाळी अंकाच्या संपादकांकडूनही विचारणा होऊ लागली ही या स्पर्धेची गेल्या २५ वर्षांच्या कार्यकाळातील यश शिखरावर झेपावणारी उत्तुंग भरारीच म्हणावी लागेल. यापुढेही या स्पर्धेचा भविष्यकाळ उज्ज्वलच असणार आहे यात शंका नाही.

# पनवेल मनपाचा महिलांच्या आरोग्यावर भर

## चारही प्रभागांत विशेष आरोग्य शिबिरे



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महानगरपालिकेच्या सेवा संकल्प अभियान २०२६ अंतर्गत महिला व बालकल्याण विभाग आणि वैद्यकीय आरोग्य विभागाच्या संयुक्त पुढाकाराने महिलांसाठी चारही प्रभागांमध्ये विशेष आरोग्य तपासणी व तज्ज्ञ मार्गदर्शन शिबिरांचे आयोजन करण्यात आले आहे. ७ ते १० ऑक्टोबरदरम्यान प्रभागनिहाय ही शिबिरे होणार असून महापालिका कार्यक्षेत्रातील महिलांनी त्यांचा लाभ घ्यावा, असे आवाहन महिला व बालकल्याण सभापती ममता म्हात्रे यांनी केले आहे.

या शिबिरांमध्ये सांधेदुखी, गुडघेदुखी, हाता-पायांची सूज व मुंग्या येणे, नसांशी संबंधित त्रास तसेच मान, पाठ व कंबरदुखी अशा समस्यांवर मोफत तपासणी व तज्ज्ञांचे मार्गदर्शन मिळणार आहे. संधीवात, मज्जासंस्था आणि फिजिओथेरपी या विषयांतील तज्ज्ञ डॉक्टरांकडून महिलांची मोफत तपासणी व मार्गदर्शन करण्यात येणार आहे. ७ ऑक्टोबर रोजी प्रभाग ड मध्ये लोकनेते दि. बा. पाटील विद्यालय, दांडेकर हॉस्पिटलजवळ पनवेल येथे, ८ ऑक्टोबर रोजी प्रभाग अ मध्ये काळभैरव सभागृह, कळंबोली येथे, ९ ऑक्टोबर रोजी प्रभाग क मध्ये प्रभाग समिती कार्यालय, कामोठे येथे, तर १० ऑक्टोबर रोजी प्रभाग ब मध्ये ज्येष्ठ नागरिक विरंगुळा केंद्र, सेक्टर १५, खारघर येथे शिबिर होणार आहे.

शिबिराची वेळ सकाळी १० ते दुपारी २ वाजेपर्यंत आहे. महिलांना परिसरातच तज्ज्ञ डॉक्टरांची आरोग्यसेवा मोफत उपलब्ध व्हावी या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात येत असून महिला व किशोरवयीन मुलींनी या शिबिरांचा जास्तीत जास्त लाभ घ्यावा, असे आवाहन महिला व बालकल्याण सभापती ममता म्हात्रे यांनी केले आहे.

# आयुष्मान कार्डसाठी विशेष शिबिरांचे आयोजन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महानगरपालिकेच्या वैद्यकीय आरोग्य विभागाच्या वतीने महात्मा ज्योतिराव फुले जनआरोग्य योजना आणि आयुष्मान भारत प्रधानमंत्री जनआरोग्य योजनेंतर्गत पात्र लाभार्थ्यांसाठी आयुष्मान कार्ड काढण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. ही प्रक्रिया पूर्णपणे निःशुल्क असून पात्र नागरिकांनी ई-केवायसी प्रक्रिया पूर्ण करून आयुष्मान कार्ड प्राप्त करून घ्यावे, असे आवाहन महापालिकेच्या वतीने करण्यात आले आहे. आयुष्मान कार्ड काढण्यासाठी महापालिकेच्या विविध आरोग्य केंद्रांमार्फत विशेष शिबिरांचे आयोजन करण्यात येत आहे.

या शिबिरांमध्ये पात्र लाभार्थ्यांची आवश्यक ई-केवायसी प्रक्रिया पूर्ण करून आयुष्मान कार्ड जनरेट करण्यात येत आहे. शासनामार्फत आयुष्मान कार्डची प्रत्यक्ष प्रत उपलब्ध करून दिल्यानंतर संबंधित लाभार्थ्यांना त्याचे वाटप करण्यात येणार आहे. या योजनेअंतर्गत समाविष्ट आजारांवरील पात्र उपचार, शस्त्रक्रिया तसेच आवश्यक वैद्यकीय उपचारांचा लाभ अंगीकृत शासकीय आणि खासगी रुग्णालयांमध्ये कॅशलेस पद्धतीने घेता येतो. मंजूर पॅकेजअंतर्गत पात्र उपचारांचा खर्च लाभार्थ्याला स्वतःच्या खिशातून करावा लागत नाही. योजनेच्या नियमानुसार संबंधित उपचाराचा खर्च रुग्णालयाला अदा केला जातो.

आयुष्मान कार्डसाठी लाभार्थ्यांनी आधार कार्ड, आधारशी लिंक मोबाइल क्रमांक, रेशनकार्ड किंवा कुटुंब ओळखपत्र तसेच कुटुंबातील सदस्यांची ओळखपत्रे सोबत आणावीत. पात्र नागरिकांनी जवळच्या आरोग्य केंद्रात आयोजित शिबिराचा लाभ घेऊन ई-केवायसी पूर्ण करावी आणि आयुष्मान कार्ड प्राप्त करून घ्यावे, असे आवाहन करण्यात आले आहे. अधिक माहितीसाठी आयुष्मान भारत योजनेच्या १४५५५ या हेल्पलाइन क्रमांकावर संपर्क साधण्याचे आवाहन महापालिकेच्या वतीने करण्यात आले आहे.

# पनवेल मनपात लोकशाही दिनी नागरिकांच्या तक्रारींचे निवारण

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

सर्वसामान्य जनतेच्या तक्रारी व समस्या तत्परतेने सोडविण्यासाठी पनवेल महानगरपालिकेच्या मुख्यालयातील बैठक कक्षामध्ये सोमवारी (दि. ५) आयुक्त मंगेश चितळे यांच्या मार्गदर्शनाखाली लोकशाही दिनाचे आयोजन करण्यात आले. यावेळी परिवहन व्यवस्थापक कैलास गावडे, उपायुक्त स्वरूप खारगे, मुख्य वैद्यकीय अधिकारी डॉ. आनंद गोसावी, सामान्य प्रशासन विभागप्रमुख कीर्ती महाजन, सर्व प्रभाग अधीक्षक, महापालिका अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

यावेळी विविध विभागांतील एकूण चार अर्ज दाखल झाले होते. या अर्जांची दखल घेऊन नागरिकांच्या समस्या तातडीने सोडविण्यात आल्या. महानगरपालिकेत दर महिन्याच्या पहिल्या सोमवारी लोकशाही दिनाचे आयोजन करण्यात येते. नागरिकांनी आपले वैयक्तिक अर्ज समन्वय अधिकाऱ्यांकडे १५ दिवस आधी द्यावेत. संबंधित नागरिकांनी लोकशाही दिनादिवशी उपस्थित राहावे, असे आवाहन महापालिकेच्या वतीने करण्यात आले आहे.



# के.गो. लिमये वाचनालयात गांधी-शास्त्री जयंती साजरी



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

राष्ट्रपिता महात्मा गांधी व दिवंगत माजी पंतप्रधान लालबहादूर शास्त्री यांच्या जयंतीनिमित्त पनवेलमधील के. गो. लिमये सार्वजनिक वाचनालय व ग्रंथालयात विनम्र अभिवादन करण्यात आले. संस्थेचे सभासद रत्नाकर कासार यांच्या हस्ते महात्मा गांधी, तर वाचक सभासद गोनुगाडे यांच्या हस्ते लालबहादूर शास्त्री यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला.

सदस्य काशिनाथ जाधव यांनी गांधी व शास्त्री यांच्या कार्याविषयी माहिती दिली. यावेळी अध्यक्षा ॲड. सुनीता जोशी, कार्यकारी सदस्य स्मिता गांधी, दत्तात्रय जाधव, सुनील भोपतराव, ग्रंथपाल निकेता शिंदे, लिपिक प्रतीक्षा गोखे, सेवक संजय दिवटे व वाचक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# पनवेल-कर्जत रेल्वेमार्गाचे काम अंतिम टप्प्यात

**पनवेल : वार्ताहर**

पनवेलकरांसाठी महत्त्वाच्या असलेल्या पनवेल-कर्जत दुहेरी उपनगरीय रेल्वेमार्गाच्या कामाने आता वेग घेतला असून प्रकल्प अंतिम टप्प्यात पोहचला आहे. पनवेल रेल्वे स्थानक परिसरात नव्या मार्गासाठी आवश्यक असलेल्या प्लॅटफॉर्म, रेल्वे रूळ, सिग्नल यंत्रणा आणि अन्य तांत्रिक कामांना गती देण्यात आली आहे. पनवेल स्थानकात नव्या मार्गासाठी स्वतंत्र प्लॅटफॉर्म उभारण्यात आले असून उर्वरित कामे पूर्ण करण्यासाठी रेल्वे कर्मचारी आणि कामगारांकडून दिवसरात्र प्रयत्न सुरू आहेत.



त्यामुळे स्थानक परिसरात प्रकल्पाच्या अंतिम टप्प्यातील कामांची लगबग पाहायला मिळत आहे. हा रेल्वेमार्ग कार्यान्वित झाल्यानंतर पनवेल, नवीन पनवेल, नेरे, चिखली तसेच कर्जत परिसरातील प्रवाशांना मोठा फायदा होणार आहे. सध्या रस्ते वाहतुकीवर अवलंबून असलेल्या नागरिकांना उपनगरीय रेल्वेचा पर्याय उपलब्ध होणार असल्याने प्रवास अधिक जलद आणि सोयीस्कर होण्याची अपेक्षा आहे. नोकरी, व्यवसाय आणि शिक्षणासाठी दररोज पनवेल-कर्जत मार्गावर प्रवास करणाऱ्या हजारो नागरिकांसाठी ही सेवा महत्त्वाची ठरणार आहे.

याशिवाय पनवेल आणि कर्जत परिसरातील दळणवळण मजबूत होऊन रायगड जिल्ह्याच्या विकासालाही चालना मिळण्याची शक्यता आहे. दरम्यान, कामाचा वेग पाहता याच वर्षी पनवेल-कर्जत रेल्वेसेवा सुरू होण्याची आशा व्यक्त केली जात आहे, मात्र रेल्वे प्रशासनाकडून सेवा सुरू करण्याची अधिकृत तारीख अद्याप जाहीर झालेली नाही. त्यामुळे आता प्रवाशांचे लक्ष रेल्वे प्रशासनाच्या अधिकृत घोषणेकडे लागले आहे.

# पनवेलच्या श्लोकची आंतरराष्ट्रीय भरारी!



**'३:३०' लघुपटाची प्रतिष्ठित फिल्म फेस्टिव्हल्समध्ये निवड**
**आमदार प्रशांत ठाकूर यांच्याकडून कौतुक व शुभेच्छा**

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेलमधील युवा कलाकार श्लोक शैलेश चौधरी याने '३:३०' या लघुपटाच्या माध्यमातून उल्लेखनीय कामगिरी करीत भारतीय तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावरील विविध प्रतिष्ठित फिल्म फेस्टिव्हल्समध्ये आपल्या कलेची दाद मिळवली आहे. या उल्लेखनीय यशाबद्दल आमदार प्रशांत ठाकूर यांनी श्लोकचे व त्याच्या पालकांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

'३:३०' लघुपटाची निवड अमेरिकेतील तस्वीर फिल्म फेस्टिव्हल सिॲटल, डीसी साऊथ एशियन फिल्म फेस्टिव्हल वॉशिंग्टन डीसी आणि साऊथ एशियन फिल्म फेस्टिव्हल शिकागो या आंतरराष्ट्रीय फिल्म फेस्टिव्हल्ससाठी झाली आहे. त्याचप्रमाणे या लघुपटाचा वर्ल्ड प्रीमियर ऑगस्ट २०२६मध्ये झालेल्या बेंगळुरू इंटरनॅशनल शॉर्ट फिल्म फेस्टिव्हल (बीआयएसएफएफ) येथे झाला.

यावेळी आमदार प्रशांत ठाकूर यांनी श्लोकशी संवाद साधत त्याच्या कलाप्रवासाबद्दल तसेच भविष्यातील वाटचालीबद्दल जाणून घेतले. पनवेलच्या युवा कलाकाराने आपल्या कर्तृत्वातून आंतरराष्ट्रीय व्यासपीठावर स्थान मिळवल्याबद्दल त्यांनी आनंद व्यक्त करीत श्लोकला पुढील यशासाठी शुभेच्छा दिल्या. ही भेट मुंबई विद्यापीठ सिनेट सदस्य व भाजप जिल्हा उपाध्यक्ष मयुरेश नेतकर यांनी घडवून आणली.

# फसवणूकप्रकरणी तरुणाला अटक

**पनवेल** : येथील झवेरी बाजारातील ओम गणेश ज्वेलर्स दुकानात ३४ हजार रुपयांची फसवणूक केल्याप्रकरणी पनवेल शहर पोलिसांनी कल्याण पूर्व येथील २८ वर्षीय तरुणाला अटक केली आहे. राहुल करपे असे अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे. याप्रकरणी ललित वदनसिंग तवर यांनी पनवेल शहर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. वरिष्ठ पोलीस निरीक्षक बाळा कुंभार यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक हजरत पठाण, पोलीस नाईक सम्राट डाकी, अनिल चव्हाण तसेच पोलीस कॉन्स्टेबल साईनाथ मोकळ, विशाल दुधे, सचिन कोर आणि दत्ता जाधव आदींचे पथक आरोपीचा शोध घेत असताना साईनाथ मोकळ यांना आरोपीबाबत माहिती मिळाली. त्यानुसार पथकाने कल्याण येथे जाऊन राहुल करपेला ताब्यात घेतले.

# पंचमीसाठी दुर्गा मूर्ती साकारण्याची लगबग

**पनवेल : वार्ताहर**

लवकरच घटस्थापनेने नवरात्रोत्सवाला सुरुवात होणार असली तरी बंगाली समाजाच्या दुर्गापूजेची तयारी आतापासूनच जोरात सुरू झाली आहे. बंगाली समाजात पंचमीच्या दिवशी माँ दुर्गेची विधिवत स्थापना करून पूजा-अर्चा करण्याची परंपरा आहे. त्यासाठी नवीन पनवेल येथील माँ काली माता मंदिर परिसरात दुर्गामूर्ती साकारण्याच्या कामाला वेग आला आहे.

माँ दुर्गेची भव्य मूर्ती घडविण्यासाठी बंगाली कारागीर पारंपरिक पद्धतीने मूर्तीकाम करीत आहेत. मूर्तीच्या निर्मितीसाठी बांबू, माती यांसह विविध साहित्याचा वापर केला जातो. मूर्तीसाठी विशेष माती कलकत्त्याहून आणली असून त्यात स्थानिक माती मिसळून मूर्ती घडविण्याची पारंपरिक पद्धत कारागिरांकडून जपली जात आहे. मूर्तीच्या सांगाड्यासाठी लागणारे बांबू व अन्य साहित्यही कलकत्त्याहून आणण्यात आले आहे.प्रथम बांबूचा सांगाडा तयार करून त्यावर मातीचे थर देत मूर्तीला आकार दिला जातो.

त्यानंतर चेहऱ्यावरील भाव, हातातील शस्त्रे, वस्त्रालंकार आणि रंगकाम अशा विविध टप्प्यांतून माँ दुर्गेचे आकर्षक रूप साकारले जाते. मूर्ती घडविण्याच्या प्रत्येक टप्प्यात कारागिरांची कलाकुसर पाहायला मिळत असून मंदिर परिसरात भक्तिमय वातावरण निर्माण झाले आहे.पंचमीच्या दिवशी माँ दुर्गेची विधिवत स्थापना झाल्यानंतर बंगाली समाजाच्या वतीने विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येणार आहे. नवरात्रोत्सवाच्या निमित्ताने पनवेलमध्ये विविध समाजांच्या परंपरा आणि संस्कृतीचे दर्शन घडत असून बंगाली समाजाची दुर्गापूजाही यंदा आकर्षणाचा केंद्रबिंदू ठरणार आहे.



# घटस्थापनेसाठी पनवेलच्या बाजारपेठा सजल्या

**पनवेल : वार्ताहर**

शारदीय नवरात्रोत्सवाला सुरुवात होण्यास अवघे काही दिवस शिल्लक असल्याने पनवेल शहरासह तालुक्यातील बाजारपेठा घटस्थापनेसाठी आवश्यक पूजा साहित्याने सजल्या आहेत. पूजा साहित्य खरेदीसाठी नागरिकांची बाजारपेठांमध्ये लगबग सुरू झाली आहे. घटस्थापनेसाठी यंदा बाजारात विविध आकारांचे, आकर्षक रंगांचे आणि नक्षीकाम केलेले मातीचे घट उपलब्ध झाले आहेत. पारंपरिक तांब्या-पितळेच्या कलशांसोबतच लाल, पिवळा, हिरवा, गुलाबी, केशरी अशा विविध रंगांतील सजावटीचे घटही ग्राहकांचे लक्ष वेधून घेत आहेत.



त्यावर कुंदन, मिरर वर्क, मोती तसेच रंगीत सजावट करण्यात आली आहे. पनवेल शहर, नवीन पनवेल, कामोठे, खारघर, कळंबोली, कर्जत रस्त्यावरील बाजारपेठांसह तालुक्यातील विविध भागांमध्ये नवरात्रीच्या पूजा साहित्याची विक्री सुरू झाली आहे. घटाभोवती सजावट करण्यासाठी रांगोळी, फुलांच्या माळा, तोरणे, देवीची चुनरी, लाल-पिवळी वस्त्रे, सजावटीची पाने, कृत्रिम फुले तसेच दिव्यांच्या माळांनाही मागणी वाढली आहे. नवरात्रोत्सवाच्या पार्श्वभूमीवर पुढील काही दिवसांत पूजा साहित्याच्या खरेदीसाठी बाजारपेठांमध्ये आणखी गर्दी होण्याची शक्यता व्यापाऱ्यांकडून व्यक्त केली जात आहे.

***नवरात्रोत्सवासाठी मंडप उभारणीला वेग***

नवरात्रोत्सवासाठी पनवेल, नवीन पनवेल आणि खांदा कॉलनी परिसरात उत्सवाची लगबग सुरू झाली आहे. देवीच्या जागरासाठी विविध मंडळांकडून जय्यत तयारी करण्यात येत असून ठिकठिकाणी नवरात्रोत्सवाचे मंडप उभारण्याच्या कामाला वेग आला आहे. नवरात्रोत्सवाच्या नऊ दिवसांत गरबा-दांडियाचा आनंद घेण्यासाठी मोठ्या संख्येने नागरिक व तरुणाई सहभागी होत असल्याने मंडळांकडून आकर्षक आणि प्रशस्त मंडप उभारले जात आहेत. मंडपाची सजावट, विद्युत रोषणाई, ध्वनिव्यवस्था तसेच देवीच्या मूर्तीच्या प्रतिष्ठापनेसाठी आवश्यक तयारी सुरू आहे.

महिला आणि तरुणींची गरबा ड्रेस, घागरा-चोळी, दागिने तसेच विविध पारंपरिक वस्तूंच्या खरेदीसाठी लगबग सुरू झाली आहे.

# विहीघरमध्ये गणेश विसर्जन घाटाची उभारणी

**नवीन पनवेल : रामप्रहर वृत्त**

गावाच्या विकासासाठी सामाजिक बांधिलकी जपत धार्मिक व सार्वजनिक उपक्रमांना भरीव योगदान देणाऱ्या गुरुनाथशेठ पंढरीशेठ फडके यांनी आपल्या दानशूर वृत्तीचा आदर्श समाजासमोर ठेवला आहे. मे महिन्यात गावातील बापदेव आणि आई गावदेवी मंदिरांच्या बांधकामासाठी तब्बल ४० लाख रुपयांची देणगी देण्यात आली.

त्यानंतर आता विहिघर येथे गणेश विसर्जनासाठी घाटाची उभारणी करून देत त्यांनी आणखी एक महत्त्वपूर्ण सामाजिक कार्य केले आहे. हा गणेश विसर्जन घाट स्व. पंढरीशेठ जगन फडके यांच्या स्मरणार्थ बांधून देण्यात आला आहे. गणेशोत्सवादरम्यान नागरिकांना सुरक्षित व सुयोग्य पद्धतीने गणेशमूर्तीचे विसर्जन करता यावे यासाठी या घाटाचा उपयोग होणार आहे. गावातील धार्मिक स्थळांच्या विकासासाठी मोठी आर्थिक मदत करण्यापासून ते नागरिकांच्या सोयीसाठी सार्वजनिक सुविधा उभारण्यापर्यंत विविध क्षेत्रांत फडके कुटुंबीयांचे योगदान राहिले आहे.

गुरुनाथशेठ पंढरीशेठ फडके हे विहिघर हायस्कूल तसेच ओम साईराम डेव्हलपर्स यांच्याशी संबंधित असून सामाजिक कार्यातही त्यांचा सहभाग राहिला आहे. गावाच्या धार्मिक, सामाजिक आणि सार्वजनिक विकासासाठी पुढाकार घेणाऱ्या गुरुनाथशेठ फडके यांच्या कार्याचे विहिघरसह परिसरातील नागरिकांकडून कौतुक होत आहे.

# पनवेलमध्ये २१ दिवसांच्या बाप्पांचे विसर्जन

**नवीन पनवेल : रामप्रहर वृत्त**

गणेशोत्सवातील भक्ती, श्रद्धा आणि उत्साहाचा अनुभव घेतल्यानंतर पनवेल परिसरात २१ दिवस विराजमान असलेल्या गणरायांना 'गणपती बाप्पा मोरया, पुढच्या वर्षी लवकर या'च्या जयघोषात भाविकांनी भावपूर्ण निरोप दिला. पनवेल पालिका हद्द व पनवेल तालुक्यात ८०पेक्षा अधिक २१ दिवसांचे गणपती विराजमान झाले होते. २१ दिवस गणरायाची मनोभावे सेवा केल्यानंतर विसर्जनाच्या दिवशी भाविकांत भावनिक वातावरण पाहायला मिळाले.



घराघरांत तसेच सार्वजनिक मंडळांमध्ये सकाळपासूनच विसर्जनाची तयारी सुरू होती. बाप्पाला फुलांची आकर्षक सजावट करण्यात आली. पूजाअर्चा केल्यानंतर गणरायाची मिरवणूक काढण्यात आली. मिरवणुकीत ढोलताशांचा गजर, लेझीम आणि 'गणपती बाप्पा मोरया'च्या जयघोषाने पनवेल परिसर दुमदुमून गेला. दरम्यान, आपल्या लाडक्या बाप्पाच्या विसर्जनावेळी भाविक भावूक झाले होते.

## संपादकीय

# शेतकऱ्यांच्या पाठीशी

दुष्काळ हा निसर्गाचा प्रकोप आहे. पण त्याचा परिणाम कमी करण्याचा प्रामाणिक प्रयत्न राज्य सरकार आपल्या नियोजनातून करते आहे. सरकारने या संकटाची तीव्रता वेळेत ओळखून दुष्काळाशी दोन हात करणे केव्हाचे सुरू केले आहे. तातडीची मदत आणि दीर्घकालीन जलनियोजन या दोन्ही आघाड्यांवर सरकारने पावले उचलली आहेत. आता ही मदत शेवटच्या शेतकऱ्यापर्यंत, शेवटच्या गावापर्यंत पोहोचवण्याची कसोटी प्रशासनाला पार पाडायची आहे.

**पावसाच्या लहरीपणाचे अत्यंत गंभीर परिणाम यंदा महाराष्ट्र अनुभवत आहे. नैऋत्य मोसमी पावसाच्या जून ते सप्टेंबर या हंगामात राज्यात सरासरीपेक्षा सुमारे १९ टक्के कमी पाऊस झाला आहे. यंदाच्या दुष्काळाची व्याप्ती मोठी आहे. त्यामुळे परिस्थितीचे गांभीर्य ओळखून राज्य सरकारने तातडीची पावले उचलली आहेत. राज्यातील ३५८ पैकी तब्बल २६५ तालुके दुष्काळग्रस्त घोषित करण्यात आले असून मराठवाड्याची अवस्था विशेष चिंताजनक आहे. या विभागात यंदा सरासरीच्या केवळ ६५.५ टक्के पाऊस झाला. लातूरमध्ये तर सरासरीच्या अवघा ५१.४ टक्के पाऊस पडला आहे. पिके हातची गेली असून विहिरी आणि अन्य जलस्रोत आटू लागले आहेत. अनेक गावांमध्ये पिण्याच्या पाण्यासाठी टँकरवर अवलंबून राहण्याची वेळ आली आहे. काही भागांत शेतकऱ्यांना पीक वाचवण्यासाठी सुद्धा टँकरने पाणी विकत घ्यावे लागत आहे. मराठवाड्यातील सोयाबीन व कापूस ही दोन्ही नगदी पिके हातची गेल्याने मजुरांना कामच उरलेले नाही. एरव्ही दसरा, दिवाळीनंतर मजूर कामासाठी गावाबाहेर पडू लागतात. परंतु यंदा बीडसारख्या जिल्ह्यांत रोजगाराअभावी आतापासूनच कुटुंबांचे स्थलांतर सुरू झाले आहे. ही केवळ शेतीची समस्या नाही. ती ग्रामीण कुटुंबांच्या जगण्याची लढाई आहे. शहराचा रस्ता धरण्याशिवाय आता पर्यायच उरलेला नाही असे या भागातील जनता म्हणू लागली आहे. मात्र मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील राज्य सरकार केवळ राज्यात 'दुष्काळ' घोषित करून थांबलेले नाही. सोबतच त्यांनी दुष्काळग्रस्तांसाठी १२ कलमी मदत–पॅकेज लागू केले आहे. पीक नुकसानीचे पंचनामे तातडीने करण्याचे आदेश जिल्हाधिकाऱ्यांना देण्यात आले आहेत. पीककर्जांचे पुनर्गठन, कृषी कर्जवसुलीला स्थगिती, जमीन महसुलात सवलत, कृषी पंपांच्या वीजबिलात सवलत, विद्यार्थ्यांच्या परीक्षा शुल्कात सूट, रोजगार हमीच्या निकषांत शिथिलता, तसेच गरजेनुसार टँकरने पाणीपुरवठा अशा उपाययोजना तातडीने सुरू करण्यात आल्या आहेत. पिण्याचे पाणी, अन्नधान्य आणि जनावरांसाठी चारा यांनाही प्राधान्य देण्यात आले आहे. येत्या काही महिन्यांतील संकटांची शक्यता लक्षात घेऊनही सरकारने नियोजन सुरू केले आहे. १६ ऑक्टोबरपासून शहरी स्थानिक स्वराज्य संस्थांना किमान १० टक्के पाणीकपात करण्याचे निर्देश देण्यात आले असून प्रत्येक धरणात १० टक्के आपत्कालीन साठा राखण्याचे नियोजन आहे. राज्यातील नागरिकांना पिण्याच्या पाण्याची टंचाई भासू नये यासाठी पिण्याच्या पाण्याला सर्वोच्च प्राधान्य देण्यात आले आहे. ३१ ऑगस्ट २०२७ पर्यंतचे धरणनिहाय पाणी नियोजन करण्यात आले असून पिण्याचे पाणी, पशुधन आणि चाऱ्याला सिंचनापेक्षा प्राधान्य दिले जाणार आहे. या संकटात केंद्र सरकारची साथही महत्त्वाची आहे. शेतकऱ्याची दिवाळी काळी होऊ नये यासाठी पुरेशी मदत उपलब्ध करून देण्याचे प्रयत्न सर्वतोपरि सुरू आहेत. हे संकट मोठे असल्याने केंद्र व राज्य सरकारने एकत्रितपणे त्याचा सामना करण्याची गरज आहे.**

# व्यसनमुक्ती : निरोगी जीवनाची वाटचाल



मानवी जीवन अनमोल आहे. ते आनंदाने, आरोग्याने आणि समाधानाने जगता यावे यासाठी आपण प्रयत्नशील असतो, पण काही सवयी आपल्या आरोग्याला आणि आनंदाला हानी पोहचवतात. व्यसन ही अशीच एक घातक सवय आहे. तंबाखू, दारू आणि इतर मादक पदार्थांचे व्यसन व्यक्तीचे शारीरिक आणि मानसिक आरोग्य बिघडवते. व्यसनमुक्ती म्हणजे या घातक सवयींपासून मुक्त होऊन निरोगी जीवन जगण्याचा संकल्प आहे. व्यसनाची सुरुवात बहुधा कुतूहलातून किंवा मित्रांच्या आग्रहातून होते. सुरुवातीला ती निरुपद्रवी वाटते, पण हळूहळू ती सवय घट्ट होते. मग त्या पदार्थाशिवाय राहवत नाही. शरीराला त्याची गरज भासू लागते. हीच व्यसनाची शोकांतिका आहे. एकदा व्यसन लागले की त्यातून बाहेर पडणे कठीण होते, पण अशक्य मात्र नाही. दृढ निश्चय आणि योग्य मार्गदर्शन यामुळे व्यसनातून मुक्ती मिळू शकते.

तंबाखूचे व्यसन आरोग्यासाठी अत्यंत हानिकारक आहे. तंबाखूमुळे तोंडाचा आणि फुफ्फुसांचा गंभीर आजार होऊ शकतो. धूम्रपान करणाऱ्या व्यक्तीच्या आजूबाजूच्या लोकांनाही त्याचा त्रास होतो. लहान मुलांवर आणि गरोदर स्त्रियांवर त्याचा विशेषतः वाईट परिणाम होतो. व्यसनांवरील खर्चामुळे कुटुंबाचे आर्थिक नियोजन बिघडते. तो पैसा मुलांच्या शिक्षणासाठी किंवा आरोग्यासाठी वापरता येईल. तंबाखूपासून दूर राहणे म्हणजे आरोग्याची आणि संपत्तीची रक्षा करणे आहे. दारूचे व्यसन कुटुंबाच्या सुखाला ग्रहण लावते. व्यसनी व्यक्तीचे आरोग्य बिघडते. यकृत आणि हृदय यांसारख्या महत्त्वाच्या अवयवांवर त्याचा वाईट परिणाम होतो. कामावर लक्ष लागत नाही. उत्पन्न घटते. घरात तणाव निर्माण होतो. मुलांच्या मनावर वाईट परिणाम होतो. अनेकदा घरगुती वाद वाढतात. दारूपासून मुक्ती मिळाली की कुटुंबात पुन्हा आनंद नांदतो. परस्पर विश्वास वाढतो. मुलांचे भविष्य उज्ज्वल होते.

तरुण पिढीला व्यसनांपासून दूर ठेवणे ही समाजाची सामूहिक जबाबदारी आहे. तरुण वयात मन चंचल असते. नवीन गोष्टींचे आकर्षण असते. अशा वेळी योग्य मार्गदर्शन मिळणे महत्त्वाचे आहे. पालकांनी मुलांशी मोकळा संवाद साधावा. त्यांच्या अडचणी समजून घ्याव्यात. त्यांना चांगल्या सवयी लावाव्यात. खेळ, कला आणि वाचन यांसारख्या छंदांकडे त्यांना वळवावे. व्यस्त आणि आनंदी मन व्यसनाकडे वळत नाही. शाळा आणि महाविद्यालयांमध्ये व्यसनांच्या दुष्परिणामांबद्दल जागृती निर्माण करावी. विद्यार्थ्यांना आरोग्य शिक्षण द्यावे. क्रीडा स्पर्धा आणि सांस्कृतिक कार्यक्रम यांमधून त्यांची ऊर्जा सकारात्मक दिशेने वळवावी. शिक्षकांनी विद्यार्थ्यांशी मैत्रीपूर्ण संबंध ठेवावेत. एखादा विद्यार्थी चुकीच्या मार्गावर जात असल्याचे दिसले, तर त्याला प्रेमाने समजावून सांगावे. वेळीच केलेले मार्गदर्शन आयुष्य बदलू शकते. व्यसनातून मुक्त होऊ इच्छिणाऱ्या व्यक्तींना समाजाने साथ द्यावी. त्यांची चेष्टा करू नये. त्यांना दोष देऊ नये. उलट त्यांच्या धैर्याचे कौतुक करावे. व्यसनमुक्ती केंद्रांमध्ये समुपदेशन आणि उपचार उपलब्ध असतात. तज्ज्ञांच्या मार्गदर्शनाखाली हळूहळू व्यसन सोडता येते. कुटुंबाचा पाठिंबा यात मोलाचा ठरतो. प्रेम आणि विश्वास यांमुळे व्यक्तीला नवी उमेद मिळते.

योग आणि व्यायाम यामुळे व्यसन सोडणे सोपे होते. नियमित व्यायामाने शरीर तंदुरुस्त राहते. मन प्रसन्न राहते. योगासनांमुळे मानसिक शांती मिळते. ध्यानधारणेमुळे मनाची एकाग्रता वाढते. चांगल्या सवयींमुळे वाईट सवयींची जागा घेतली जाते. सकाळी फिरायला जाणे, बागकाम करणे आणि खेळ खेळणे यांसारख्या सवयी आरोग्यासाठी फायदेशीर आहेत. निरोगी शरीरात निरोगी मन वास करते. व्यसनमुक्त व्यक्तींच्या यशोगाथा इतरांना प्रेरणा देतात. अनेक लोकांनी दृढ निश्चयाने व्यसन सोडले आहे. त्यांचे जीवन पूर्णपणे बदलले आहे. त्यांचे आरोग्य सुधारले आहे. त्यांचे कुटुंब सुखी झाले आहे. ते समाजात आदराने जगत आहेत. अशा व्यक्तींनी आपले अनुभव इतरांशी वाटून घ्यावेत. त्यांच्या गोष्टींतून अनेकांना नवी आशा मिळेल. एका व्यक्तीचा बदल अनेकांचे जीवन बदलू शकतो. सण आणि उत्सव यांच्या काळात व्यसनमुक्तीचा संदेश द्यावा. आनंद साजरा करण्यासाठी व्यसनाची गरज नसते. खरा आनंद निरोगी शरीरात आणि समाधानी मनात असतो. कुटुंबासोबत घालवलेला वेळ, मित्रांसोबतचे हास्य आणि निसर्गाचा सहवास यांतून मिळणारा आनंद खरा आणि टिकाऊ असतो. उत्सवांच्या निमित्ताने व्यसनमुक्तीची शपथ घ्यावी. नवीन वर्षाची सुरुवात चांगल्या संकल्पाने करावी.

कामाच्या ठिकाणीही व्यसनमुक्त वातावरण राखावे. सहकाऱ्यांनी एकमेकांना प्रोत्साहन द्यावे. चहाच्या वेळेत गप्पा माराव्यात, पण व्यसनांना थारा देऊ नये. निरोगी कर्मचारी म्हणजे उत्पादक संस्था. त्यामुळे सर्वांचेच हित साधले जाते. व्यसनमुक्तीमुळे होणारी आर्थिक बचत लक्षणीय असते. दररोज व्यसनांवर खर्च होणारा पैसा महिनाअखेर मोठ्या रकमेत रूपांतरित होतो. हा पैसा वाचवला तर कुटुंबाच्या भल्यासाठी वापरता येतो. मुलांच्या शिक्षणासाठी, घराच्या दुरुस्तीसाठी किंवा भविष्यातील गरजांसाठी त्याची बचत करता येते. अनेक कुटुंबांनी व्यसन सोडल्यानंतर आपली आर्थिक स्थिती सुधारल्याचे सांगितले आहे. पैशाची बचत म्हणजे भविष्याची सुरक्षितता आहे. महिलांची भूमिका व्यसनमुक्तीत अत्यंत महत्त्वाची आहे. आई, पत्नी किंवा बहीण म्हणून त्या कुटुंबातील व्यक्तींना प्रेमाने समजावून सांगू शकतात. त्यांच्या संयमामुळे आणि पाठिंब्यामुळे अनेक व्यक्तींनी व्यसन सोडले आहे. महिला बचत गटांच्या माध्यमातून व्यसनमुक्तीचा संदेश गावागावांत पोहोचवता येतो. माता–पालक संघटनांनी शाळांमध्ये जागृती कार्यक्रम राबवावेत. स्त्रियांच्या सहभागामुळे ही चळवळ अधिक प्रभावी होते.

गाव आणि शहर पातळीवर व्यसनमुक्तीचे उपक्रम राबवता येतात. युवक मंडळांनी क्रीडा स्पर्धा आयोजित कराव्यात. त्यातून तरुणांची ऊर्जा सकारात्मक कामी लागते. धार्मिक आणि सामाजिक संस्था कीर्तन, प्रवचन यांमधून चांगल्या सवयींचा संदेश देऊ शकतात. ग्रंथालयांमध्ये आरोग्यविषयक पुस्तके ठेवावीत. शाळांमध्ये निबंध आणि वक्तृत्व स्पर्धा घ्याव्यात. अशा उपक्रमांमधून समाजात जागृतीचे वातावरण निर्माण होते. तणाव हे व्यसनाचे एक प्रमुख कारण मानले जाते. कामाचा ताण, आर्थिक चिंता किंवा कौटुंबिक समस्या यांमुळे काही लोक व्यसनाकडे वळतात. पण तणावावर मात करण्यासाठी निरोगी मार्ग उपलब्ध आहेत. प्राणायाम आणि ध्यान यांमुळे मन शांत होते. छंद जोपासल्याने मन गुंतून राहते. मित्रांशी आणि कुटुंबाशी संवाद साधल्याने मन हलके होते. समुपदेशकांची मदत घेण्यात कोणताही कमीपणा नाही. तणावाचे योग्य व्यवस्थापन केल्यास व्यसनाची गरजच भासत नाही. प्रत्येक घरात, प्रत्येक मनात व्यसनमुक्तीचा दीप प्रज्वलित व्हावा. निरोगी सवयी हाच खरा दागिना आहे. चला, एकत्र येऊन व्यसनमुक्त समाज घडवूया. निरोगी आयुष्यासाठी आजच व्यसनमुक्तीचा निर्धार करूया आणि इतरांनाही सोबत घेऊया.

व्यसनमुक्ती ही केवळ व्यक्तीची नव्हे, तर संपूर्ण समाजाची गरज आहे. निरोगी व्यक्ती, सुखी कुटुंब आणि प्रगत समाज यासाठी व्यसनमुक्ती आवश्यक आहे. चला आजच संकल्प करूया. व्यसनांपासून दूर राहूया. इतरांनाही प्रेरित करूया. निरोगी जीवन हाच खरा टिकाऊ आनंद आहे. हा संदेश घरोघरी पोहचवूया. व्यसनमुक्त समाजाच्या निर्मितीसाठी प्रत्येकाने मनापासून हातभार लावावा. हेच आपले पवित्र ध्येय असावे.

(साभार इंटरनेट)



## बदलते तंत्रज्ञान

### स्मार्टफोन सर्व ऐकतोय, या मार्गांनी राहा सुरक्षित

तुम्ही जर स्मार्टफोन वापरत असाल तर तुम्हाला कधी कधी वाटत असेल की तुमचा फोन तुमच्या सर्व गोष्टी ऐकतोय. तुम्ही ज्या ज्या गोष्टी बोलता त्याविषयीच्या गोष्टी आपल्याला जाहिराती किंवा सोशल मीडियावर येत असतात. या स्मार्टफोनमुळे आता आपली गोपनीय माहिती सुरक्षिततेबाबत चिंता व्यक्त करण्यात आली आहे.



अनेक वेळा आपण स्मार्टफोनमध्ये इन्स्टॉल केलेल्या ॲप्सना कॅमेरा, मायक्रोफोन आणि स्टोरेजचा ॲक्सेस देतो. असे केल्याने, हे ॲप्स आपल्या प्रत्येक गोष्टीवर लक्ष ठेवतात. अशा परिस्थितीत, स्मार्टफोनमध्ये असलेल्या ॲप्सना फक्त आवश्यक परवानग्या देणे महत्वाचे आहे. अनावश्यक ॲप्सना परवानग्या देऊ नका.

तुमची हेरगिरी करण्यासाठी फोन कॅमेरा आणि माइकचा वापर केला जातो. जर तुमच्या फोनचा कॅमेरा किंवा माइक कोणत्याही गरजेशिवाय सक्रिय केला असेल तर तुम्ही तो शोधू शकता. जेव्हा जेव्हा फोनचा कॅमेरा किंवा माइक चालू असतो तेव्हा स्क्रीनवर हिरवा दिवा चमकत असतो.

तुमच्या स्मार्टफोनवर इंस्टॉल केलेल्या ॲप्सच्या परमिशन मॅनेज करण्यासाठी तुम्हाला फोनच्या सेटिंग्ज मेनूमध्ये जावे लागेल. यानंतर, तुम्हाला प्रायव्हसी अंतर्गत परमिशन मॅनेजरमध्ये जाऊन ॲप परवानग्या मॅनेज कराव्या लागतील.

येथे तुम्ही मायक्रोफोन, कॅमेरा आणि लोकेशन यासारख्या ॲपला कोणता ॲक्सेस देण्यात आला आहे ते पाहू शकाल. यात तुम्ही मजबूत गोपनीयता ठेवण्यासाठी, आपण फक्त आवश्यक असलेल्या ॲप्सना परवानगी दिली पाहिजे.

स्मार्टफोन कंपन्या दर महिन्याला किंवा नियमित अंतराने त्यांच्या उपकरणांसाठी सुरक्षा अपडेट्स देत असतात. यासोबतच, फोनमध्ये इंस्टॉल केलेले ॲप्स वेळोवेळी अपडेट करत रहा. तुमचा फोन अपडेटेड ठेवल्याने तुमची सुरक्षा मजबूत होते आणि तुमचा फोन स्पायवेअर आणि मालवेअरपासून सुरक्षित राहतो.

जर तुम्ही तुमच्या फोनमध्ये गुगल असिस्टंट, सिरी किंवा अलेक्सासारखे व्हॉइस असिस्टंट वापरत असाल तर ते बंद ठेवा. व्हॉइस असिस्टंट बंद ठेवण्यासाठी सेटिंग्जमध्ये व्हॉइस असिस्टंटवर जा आणि ते बंद करा. यामुळे गरज असेल तेव्हाच फोनचा मायक्रोफोन चालू होईल.

# गायक, संगीतकार डॉ. सलील कुलकर्णी



## निमित्त

डॉ. सलील कुलकर्णी हे नावाजलेले मराठी–भारतीय गायक, संगीतकार आणि लेखक आहेत. मराठी चित्रपटसृष्टीतील सर्वात लोकप्रिय संगीत कलाकारांपैकी एक, सलील कुलकर्णी हे संगीतकार, गायक आणि लेखक आहेत. सलीलला लहानपणापासूनच संगीताची आवड होती, त्यांनी फक्त तीन वर्षांचा असताना ऑल इंडिया रेडिओ, पुणेवर मराठी गद्य 'जयोस्तुते' गायले होते

सलील यांचा जन्म ६ ऑक्टोबर १९७२ साली पुण्यात झाला. सलील यांनी त्यांची सांगीतिक कारकीर्द वयाच्या तिसऱ्या वर्षी आकाशवाणी वरून केली. ते केवळ संगीतकार नाही तर उत्तम गायक आणि लेखकही आहेत. एका मुलाखतीत सलील यांनी सांगितले की, घरात सर्वच उत्तम वाचक असल्यामुळे वाचनाची सवय लावली आणि शाळेत गेल्यानंतर कविता आवडीचा विषय बनली आणि त्यातच मन रमु लागले.

त्यांनी संगीताचे शिक्षण पं. गंगाधरबुवा पिंपळखरे, जयमाला शिलेदार आणि प्रमोद मराठे यांच्याकडे घेतले. शिक्षणाने ते डॉक्टर असून संगीताची प्रचंड आवड असल्याने त्यांनी संगीतामध्ये बस्तान बसवले.

सलील कुलकर्णी यांनी त्यांच्या कारकिर्दीची सुरुवात अनेक अल्बम आणि शोसाठी गायक म्हणून केली १९९६ साली सलील यांची ओळख अंजली यांच्या सोबत झाली. अंजली या अनुराधा मराठे यांच्या कन्या आहेत. बरयाच ठिकाणी सलील व अंजली यांनी एकत्र गायन केले. दोघांचाही दुवा संगीत असल्याने दोघांची मैत्री चांगलीच गुफली. दोघांच्याही आवडी, निवडी संगीतात नवे काही तरी करण्याची धडपड यामुळे नकळत दोघांची मने जुळली. सलील लग्नासाठी मुलीच्या शोधत होते. त्यावेळी अंजली व सलील यांनी आपण दोघे एकमेकांना अनुकुल असल्याचे वाटल्यामुळे दोघांनीही लग्न करण्याचा निर्णय घेतला. लग्न झाल्यावर काही दिवसांतच सलील यांनी डॉक्टरची भल्यामोठ्या पगाराची नोकरी सोडून पूर्णवेळ संगीतात काम करण्याचे ठरवले. १९९९ मध्ये 'आनंद पहाट' या मराठी चित्रपटातून त्यांनी पदार्पण केले. त्यांनी अनेक हिंदी आणि मराठी अल्बमना संगीत दिले आहे. तसेच हिंदी आणि मराठी चित्रपटांना संगीत त्यांनी संगीत दिले आहे. २००३ मध्ये संदीप खरे यांच्या बरोबर त्यांनी आयुष्यावर बोलू काही हा सांगीतिक कार्यक्रम सुरू केला त्याला अफाट प्रसिद्धी मिळाली. त्याचे ७०० च्या वर प्रयोग झाले झी मराठी ने नक्षत्रांचे देणे हा विविध संगीतकार आणि कवी यांच्या गीतांवरील कार्यक्रमाचे संगीत नियोजन त्यांनी केले.

नवीन पिढीचे संगीतकार अशी त्यांची ओळख असून त्यातही बालगीतांचे संगीतकार म्हणून त्यांना जास्त पसंती आहे. त्यांचा अग्गोबाई ढग्गोबाई (अल्बम) हे विशेष गाजले आहेत.

दूरचित्रवाणीवरील सारेगमप तसेच गौरव महाराष्ट्राचामधील परीक्षक म्हणून त्यांना भरपूर प्रसिद्धी मिळाली. क्रिकेट आणि स्वयंपाकघरातील खुसखुशीत उदाहरणे देऊन त्यांनी नवीन गायकांना मार्गदर्शन केले आहे. आयुष्यावर बोलू काही या कार्यक्रमापासून ते सारेगमपमधील परीक्षकापर्यंतचा सलील यांचा प्रवास पाहता ते आज लहानथोरांचे आवडते झाले आहेत.

(साभार इंटरनेट)

## चित्र रंगवा



## आरोग्य प्रहर

### ऑक्टोबर हीटमध्ये अशी घ्या स्वतःची काळजी

पावसाळा जसजसा संपू लागतो, तसे आपण सगळेच हिवाळा सुरू होण्याची वाट पाहू लागतो, पण सध्या आपण सगळेच 'ऑक्टोबर हीट'चा सामना करीत आहोत, ज्याला पावसाळ्यानंतरचे हवामान म्हणतात. विशेषतः उष्ण कटिबंधीय आणि उपोष्ण कटिबंधीय प्रदेशांमध्ये हे हवामान आढळून येते.



याबद्दल डॉ. आविद अमीन सांगतात की, उन्हाळ्यातील उष्णता कोरड्या वातावरणात असते, तर ऑक्टोबर हीटमध्ये पावसाळ्यातून उरलेल्या आर्द्रतेसह उच्च तापमान असते. ऑक्टोबरमध्ये कमी किंवा अगदी न पडलेल्या पावसामुळे वातावरणात आर्द्रता टिकून राहते, ज्यामुळे तापमानातील उष्णता अनुभवायला मिळते, पण ही उष्णता उन्हाळ्यातील तापमानासारखी कोरडी नसते. त्यामुळे विशेषतः उत्तर भारत, महाराष्ट्र, गुजरात यांसारख्या प्रदेशांमध्ये अस्वस्थ करणारे वातावरण निर्माण होते, जे कोरड्या उन्हाळ्याच्या उष्णतेपेक्षा वेगळे ठरते. या कालावधीत वारा नसल्यामुळे अस्वस्थता वाढू शकते, कारण उष्णता, आर्द्रता वातावरणात अडकून राहते. याशिवाय शहरी भागात उष्णतेच्या बेटाच्या घटनेमुळे एक मिश्रित प्रभाव अनुभवला जातो. या ठिकाणी काँक्रीट, डांबरी पृष्ठभाग उष्णता शोषून घेतात आणि ती टिकवून ठेवतात आणि त्यामुळे शहरे या काळात आणखी गरम होतात.

ऑक्टोबर हीटमध्ये सुरक्षित राहण्यासाठी आणि शरीराला हायड्रेशन मिळवून देण्यासाठी दिवसभर भरपूर पाणी प्या. शरीर थंड राहण्यासाठी सौम्य रंगाचे अन् सैलसर कपडे घाला. सकाळी १० ते दुपारी ४दरम्यान खूप ऊन असेल त्या वेळी बाहेर जाणे टाळण्याचा प्रयत्न करा. पंखे, वातानुकूलन यंत्र यांद्वारे तुमच्या घरातील वातावरण थंड ठेवा. शरीराचे तापमान कमी करण्यासाठी वारंवार थंड शॉवर, स्पंज बाथ घ्या फळे, भाज्या भरपूर असलेल्या हलक्या जेवणाचे सेवन करा. त्यामुळे शरीरातील उष्णता न वाढता, तुमची ऊर्जा टिकून राहते आदी उपाय सुचवले आहेत. त्याचबरोबर कॅफिन, अल्कोहोल टाळण्याचा प्रयत्न करा, कारण यामुळे डिहायड्रेशन होऊ शकते. त्याचप्रमाणे या वातावरणात वृद्ध, लहान मुले आदी व्यक्तींची तपासणी करणेदेखील महत्त्वाचे आहे. ते उष्णतेच्या बाबतीत अधिक संवेदनशील असतात. त्यामुळे तुमच्या अन् त्यांच्या शरीराकडे लक्ष द्या. तुम्हाला चक्कर येणे, थकवा येणे किंवा डोकेदुखी जाणवू लागल्यास उष्णतेशी संबंधित हे आजार टाळण्यासाठी वैद्यकीय मदत घ्या.

# सोनसाखळीसाठी खून करणाऱ्या दोघांना जन्मठेप

**अलिबाग : प्रतिनिधी**

सोन्याची चैन आणि मोबाईल लुटण्याच्या उद्देशाने ६० वर्षीय पांडुरंग लहू भडकले यांचा दगडाने मारहाण करून खून केल्याप्रकरणी दोघांना जन्मठेपेची शिक्षा सुनावण्यात आली. पेण तालुक्यातील कांदळेपाडा येथील रोजेश नागू म्हात्रे आणि बारशेतवाडी येथील गोवर्धन सिताराम वाघमारे अशी शिक्षा झालेल्या आरोपींची नावे आहेत.अतिरिक्त सत्र न्यायालय, न्यायाधीश सुनीता तिवारी यांनी हा महत्त्वपूर्ण निकाल दिला.

मयत पांडुरंग भडकले हे बोरगाव येथील रहिवासी होते. आरोपींनी संगनमत करून त्यांना मोटारसायकलवरून घटनास्थळी नेले. त्यांच्या गळ्यातील सोन्याची चैन आणि खिशातील मोबाईल काढून घेतल्यानंतर चेहरा व डोक्यावर दगडाने मारहाण करून त्यांचा खून केला. त्यानंतर पुरावा नष्ट करण्याच्या उद्देशाने मृतदेह कालव्याच्या पाण्यात टाकून दिला होता.

या प्रकरणी पेण पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाल्यानंतर पोलीस निरीक्षक देवेंद्र पोळ यांच्या मार्गदर्शनाखाली तपास करण्यात आला. तपासात पोलिसांनी आरोपींविरोधात ठोस पुरावे न्यायालयासमोर सादर केले.

न्यायालयाने भारतीय दंड संहिता कलम ३०२ सह ३४ अन्वये दोन्ही आरोपींना जन्मठेप व प्रत्येकी ८ हजार रुपये दंड, दंड न भरल्यास ८ महिने सश्रम कारावासाची शिक्षा सुनावली. कलम २०१ सह ३४ अन्वये ५ वर्षे सश्रम कारावास व ५ हजार रुपये दंड, तर कलम ३९७ सह ३४ अन्वये ७ वर्षे सश्रम कारावास व ७ हजार रुपये दंड अशी शिक्षा ठोठावण्यात आली. दंड न भरल्यास संबंधित अतिरिक्त कारावासाची शिक्षाही सुनावण्यात आली.

या खटल्यात फिर्यादी, पंच, साक्षीदार, तपासी अधिकारी आणि वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या साक्षी महत्त्वपूर्ण ठरल्या. सरकारी अभियोक्ता ॲड. संतोष पवार यांच्यासह ॲड. प्रमोद हजारे, ॲड. कोमल राठोड आणि ॲड. दिलीप बहिरम यांनी सरकार पक्षाची बाजू मांडली.

तपासादरम्यान पोलीस हवालदार जयवंत बैकर यांनी महत्त्वाचे सहकार्य केले. तसेच पैरवी अधिकारी सहायक पोलीस उपनिरीक्षक अमोल गंगधर, सहायक फौजदार पांडुरंग पाटील, पोलीस शिपाई भाऊराव पाटील आणि पोलीस शिपाई विजय बोदरे यांनी खटल्याच्या कामकाजात मोलाची भूमिका बजावली.

# रसायनीतील पिल्लई कॉलेजमध्ये करिअर मार्गदर्शनासह फोटोग्राफी प्रदर्शन



**मोहोपाडा : प्रतिनिधी**

रसायनी येथील पिल्लई कॉलेज ऑफ आर्ट्स, सायन्स ॲंड कॉमर्समध्ये विद्यार्थ्यांसाठी एक दिवसीय विशेष करिअर मार्गदर्शन शिबिराचे आयोजन करण्यात आले. भविष्यातील शिक्षणाच्या विविध दिशा तसेच रोजगाराच्या उपलब्ध संधींची विद्यार्थ्यांना माहिती करून देणे हा या शिबिराचा मुख्य उद्देश होता.

शिबिराच्या सुरुवातीला महाविद्यालयातील प्राध्यापक व तज्ज्ञ मार्गदर्शकांनी विद्यार्थ्यांचे स्वागत केले. वाढत्या तंत्रज्ञानाच्या युगात पारंपरिक शिक्षणासोबतच कोणत्या नव्या क्षेत्रांमध्ये करिअरच्या उत्तम संधी उपलब्ध आहेत, याचे सविस्तर सादरीकरण पीपीटीच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना करण्यात आले. यामध्ये विज्ञान, वाणिज्य, कला, आयटी तसेच विविध व्यावसायिक अभ्यासक्रमांची माहिती देण्यात आली.

विद्यार्थ्यांच्या मनातील करिअरविषयक शंकांचे निरसन करण्यासाठी विशेष प्रश्नोत्तर सत्र घेण्यात आले. विद्यार्थ्यांनी विचारलेल्या विविध प्रश्नांना तज्ज्ञांनी सोप्या भाषेत मार्गदर्शन केले. या शिबिरामुळे भविष्यात योग्य क्षेत्राची निवड कशी करावी, याबाबत उपयुक्त माहिती मिळाल्याची भावना विद्यार्थ्यांनी व्यक्त केली. कार्मेल शाळेच्या शिक्षकांनीही पिल्लई कॉलेज प्रशासनाचे या उपक्रमाबद्दल आभार मानले.

# श्रीवर्धनमध्ये कोतवालपदांच्या आठ रिक्त जागांसाठी भरती

**श्रीवर्धन : बातमीदार**

श्रीवर्धन तालुक्यातील आठ तलाठी सजांमध्ये रिक्त झालेली कोतवाल( महसूल सेवक) पदाची भरती जाहीर करण्यात आली आहे. श्रीवर्धन तालुक्यातील श्रीवर्धन, मारळ, जसवली, कोंडविल, वडवली, गालसुरे, सर्वे, दिघी या आठ तलाठी सजांमध्ये कोतवाल (महसूल सेवक) ही पदे रिक्त झाली होती. सदरची पदे भरती करण्यासाठी जाहिरात प्रसिद्ध करण्यात येत असून, या महिन्यातील २ ऑक्टोबर पासून १७ ऑक्टोबर पर्यंत इच्छुक उमेदवारांनी योग्य त्या कागदपत्रांसह समक्ष तहसील कार्यालयात येऊन आपला उमेदवारी अर्ज दाखल करावयाचा आहे.

२ सप्टेंबर २०२६ रोजी १८ वय पूर्ण असलेल्या व ४० पेक्षा कमी वय असलेल्या उमेदवारांना भरती प्रक्रियेत सहभागी होता येणार असून किमान शिक्षणाची अट इयत्ता चौथी पास आहे. त्याचप्रमाणे मराठी भाषेचे ज्ञान आवश्यक आहे. तसेच परिसरातील भौगोलिक स्थितीची देखील उमेदवाराला माहिती असणे आवश्यक आहे. उमेदवार हा स्थानिकच असावा. अशी अट देखील या भरतीमध्ये जाहीर करण्यात आली आहे. कोतवाल (महसूल सेवक) पदासाठी लेखी परीक्षा १५ नोव्हेंबर रोजी घेण्यात येणार असून १६ नोव्हेंबर रोजी निकाल लागणार आहेत. तर १७ नोव्हेंबर ते २७ नोव्हेंबर या कालावधीत दस्तावेजांची पडताळणी करण्यात येणार आहे. पात्र उमेदवारांना २८ नोव्हेंबर रोजी नियुक्तीपत्र देण्यात येणार आहे.



# धाटाव एमआयडीसीत टँकरच्या धडकेत तरुणाचा मृत्यू

**धाटाव** :धाटाव एमआयडीसी परिसरात टँकर मागे घेत असताना झालेल्या अपघातात एका तरुणाचा मृत्यू झाल्याची घटना रविवारी रात्री घडली. अजय सुभाष सरकारा धाटाव, ता. रोहा असे मृत्यू झालेल्या तरुणाचे नाव आहे.

दि. ४ ऑक्टोबर रोजी रात्री सुमारे ८.१३ वाजण्याच्या सुमारास धाटाव एमआयडीसीतील सुदर्शन कंपनीच्या मागील बाजूस बारसोली गावाकडे जाणाऱ्या रस्त्यावरील वळणावर हा अपघात झाला. आरोपी चालक सोहनलाल कानिया मिना रा. धानी फला, राजस्थान याने बारसोलीकडील वळणावर टँकर मागे घेत असताना रस्त्याच्या परिस्थितीकडे दुर्लक्ष करून निष्काळजीपणे व बेदरकारपणे वाहन चालविल्याने टँकरची अजय सरकार याला धडक बसली.

## Public Works Department Government of Maharashtra

Request for Proposal (RFP)

e-Tender Notice No.22/for 2026-27

**NOTICE INVITING TENDER (NIT)**

1. Bids for "Appointment of Procurement Advisor for Various Projects to be undertaken with financial assistance of MDBs under EPC Mode" are hereby invited are hereby invite from eligible Consultants through online on the e-tender portal of the Government of Maharashtra i.e. http://mahatenders.gov.in. The RFP can be downloaded from Dt 05.10.2026 at 10.00 am to Dt. 12.10.2026 upto 6.00 pm. on payment of a non-refundable fee of Rs. 5,900/- (Rupees Five Thousands Nine Hundred Only) including GST at the time of download of the RFP.
2. The Proposals must be submitted online at the e-tender portal of the Public Works Department, Government of Maharashtra i.e http://mahatenders.gov.in on or before Dt. 12.10.2026 upto 5.00 pm.
3. Before submitting the proposal, the bidders shall mandatorily register and enlist themselves (the firm and all key personnel)on enlist themselves (the firm and all key personnel) on http://mahatender.gov.in further, the bidders shall follow the operating procedure as may be prescribed on the said website.
4. For any technical related queries, please call the 24 X 7 Help Desk Number, 0120-4001 002,0120-4001 005, 0120-6277787 International Bidders are requested to prefix 91 as country code.
   Technical: support-eproc@nic.in
5. The following schedule is to be followed for this assignment:
   (I) Period for downloading of bid: from dt 05.10.2026 at 10.00 am to dt. 12.10.2026 6.00 pm
   (II) Last date for submission of queries: 11:00 hours of dt 07.10.2026
   (III) Pre-Bid Meeting: 12:00 hours of dt. 07.10.2026
   (Iv) Deadline for Submission of bids: 18:00 hours of dt 12.10.2026
   (v) E-Tender opening date: 15:00 hours of dt. 14.10.2026

**Outward No : PNL/TC/**
**Office of the Executive Engineer Public Works Division, Panvel**
**Dated : 05/10/2026**

**sd/-**
**EXECUTIVE ENGINEER, PUBLIC WORKS DIVISION, PANVEL**

## PUBLIC NOTICE

ADV GEETA CHAUDHARY

IN THE COURT OF CIVIL JUDGE (J.D) AT PANVEL

CIVIL MISCELLANEOUS APPLICATION NO. 841 / 2026

नि 7/ड

N. Date 06/11/2026

**Lalman Ramkripal Gupta**
Age about 53 Years, Occ: Service,
Hindu, Residing at, Flat No. A-3/9,
Kendriya Vihar (2) CHS LTD., Plot No. 69,
Sector 11, Kharghar, Distt Raigad,
Maharashtra - 410210 ....... Applicant

**Vs**

Ramchet Ramkripal Gupta
Age about 66 Years, Occ: Service, Hindu,
Residing at, Flat No. A-3/9, Kendriya Vihar
(2) CHS LTD., Plot No. 69, Sector 11,
Kharghar, Distt Raigad,
Maharashtra - 410210. ....Respondent

**Applicant is Son of Late Mrs. Mathura Ramkripal Gupta,** who expired on **20th January 2026** at Kharghar, Panvel. The copy of Death certificate issued by the Panvel Municipal Corporation.

The Description of Immovable Property in the name of deceased **Late Late Mrs. Mathura Ramkripal Gupta**

SCHEDULE NO. 1

SCHEDULE OF PROPERTY

VALUATION OF IMMOVABLE PROPERTY OF THE DECEASED ABOVENAMED

| IN THE STATE OF MAHARASHTRA | |
|---|---|
| PARTICULARS OF PROPERTY | VALUATION |
| FLAT NO- A-3/9, KENDRIYA VIHAR Appro (2) CO-OP. HSG. SOC. LTD, SECTOR 11, KHARGHAR, DISTT RAIGAD, MAHARASHTRA. (1/3rd of Flat) | Appro Rs. 50,00,000/- |

Where the above name applicant Mr. Lalman Ramkripal Gupta has filed Application for the Heirship certificate as per provisions contained in section 2 of Bombay regulation Act No. VIII 1827 in the Court of Civil Judge Junior Division at Panvel.

You the members of the Public are hereby given notice to appear in the court of Civil Judge (J.D) Panvel in person or by pleader. Duly instructed and to file your say/objection if any within 30 (Thirty) Days from the date of publication of this Public Notice or before 06 November 2026, failing which said application will be held presuming that there is no objection from anybody and the application will be finally decided.

Given under the hand and sealed of the Court this _05 Day of October , 2026

Court Stamp

**Sd/-**
**Asst. Superrintendent**
**Civil Court (JD) Panvel**

## पत्नीला मारहाण; जीवे मारण्याची धमकी

**मोहोपाडा :** रसायनीतील सावळे येथे महिलेला कोयत्याने मारहाण करून दुखापत केल्याची घटना घडली.याप्रकरणी रसायनी पोलीस ठाण्यात एका आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

दि. ४ ऑक्टोबर रोजी आरोपीने महिला फिर्यादीच्या घरी जाऊन,'तुला मला ठेवायचे नाही' असे रागाच्या भरात बोलून शिवीगाळ केली. त्यानंतर आणलेल्या कोयत्याने फिर्यादीच्या डोक्यात वार करून तिला दुखापत केल्याचे फिर्यादीत नमूद आहे.

दरम्यान,भांडण सोडविण्यासाठी फिर्यादीची आई पुढे गेली असता झटापटीमध्ये कोयत्याचे टोक त्यांच्या खांद्याला व डाव्या हाताला लागून दुखापत झाल्याचे पोलिसांनी सांगितले.यानंतर आरोपीने फिर्यादीचा हात जबरदस्तीने पकडून तिला देवळोली येथील क्रिकेट मैदानावर पुन्हा हाताबुक्यांनी मारहाण करून जिवे मारण्याची धमकी दिली.

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील प्रमाणे वर्णन केलेली मिळकत जमीनमालक **श्री. किसन गोविंद पाटील रा. चेरवली, पो. वाजे, ता. पनवेल, जि. रायगड** यांजकडून सदर मिळकत विकत घेण्याच्या विचारात आहेत.

**: मिळकतीचे वर्णन:**
**मौजे : चेरवली, ता. पनवेल, जि. रायगड**

| स.नं. | हि.नं. | क्षेत्र (हे.आर.चौ.मी.) | आकार रु.पै. |
|---|---|---|---|
| ४४ | ७ | ०-४६-००<br>वरकस ०-३१-१०<br>पो.ख. ०-२४-८०<br>एकूण १-०१-९०<br>पैकी जमिनमालक यांचे मालकीचे | ७.२५ |
| | | ०-२९-८५<br>पो.ख. ०-१०-५०<br>एकूण ०-४०-३५<br>पैकी ०-२०-०० क्षेत्राबाबत | २.८१ |

०-२०-०० (हे.आर.चौ.मी.) क्षेत्राबाबत

तरी सदरहू मिळकतीवर वा कोणत्याही भागावर गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, वचनचिठ्ठी, खरेदीखत, तारण, भाडेकरूपणाचा हक्क, पोटगी, साठेकरार, वा तत्सम कोणतेही दावे मालकी वा अन्य हक्क हितसंबंध असलेल्या व्यक्तींनी वा संबधीतांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांच्या आत आपल्या हक्क, हितसंबंधाचे स्वरूप विषद करून प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांचे पत्त्यावर लेखी कळवावे. जर वरील मुदतीत कोणाकडूनही काही लेखी हरकत, तकार, दावा न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजारहीत असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही किंवा असल्यास सदर हरकती, तकारी रद्दबातल आहेत किंवा त्या सोडून दिल्या आहेत असे गृहीत धरून आमचे अशील सदर व्यवहार पूर्ण करतील, याची तमाम लोकांनी नोंद घ्यावी. व सदर मुदतीनंतर आलेल्या हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही.

**पनवेल,**
**दिनांक: ०५/१०/२०२६**

**सही/-**
**निलेश द. हातमोडे**
**ॲडव्होकेट**
**मो नं ८१०८५५८२८९**

## पनवेल महानगरपालिका शिक्षण विभाग

लोकनेते दि.बा.पाटील विद्यालय,आगरी समाज हॉल व दांडेकर हॉस्पिटल समोर,पनवेल- ४१० २०६.

Email - msbpanvel1993@gmail.com Email :panvelcorporation@gmail.com

### जाहीर सूचना

पनवेल महानगरपालिकेच्या इंग्रजी माध्यमाच्या शाळेतील LKG व UKG वर्गातील विद्यार्थ्यांच्या इंग्रजी भाषेतील प्राविण्यासोबतच इतर भाषांचे सुलभ, आनंदायी व प्रभावी शिक्षण मिळावे यासाठी “बोलकी पुस्तके (Talking Pen)” हा अभिनव शैक्षणिक उपक्रम राबविण्याचा प्रस्ताव सादर करीत आहे. हा उपक्रम राष्ट्रीय शैक्षणिक धोरण (NEP)२०२० च्या मार्गदर्शक तत्वांनुसार आखलेला आहे.

सदर प्रस्तावित कार्यक्रमासाठी अंदाजित खर्च निश्चित करण्याच्या दृष्टीने इच्छुक निविदाधारक / नोंदणीकृत संस्था यांचेकडून खालील तपशीलानुसार बाजारभावासाठी दरपत्रके मागविण्यात येत आहेत.

| Sr. | Jr/ LKG – १२ पुस्तके | प्रमाण / नग | दर (GST) सह |
|---|---|---|---|
| १ | English Reader For Leaders – Part B | | |
| २ | English Activity – Part B | | |
| ३ | English Writing – Part B | | |
| ४ | Little Artist- Part B | | |
| ५ | Math A Magic – Part B | | |
| ६ | Maths Activity – Part B | | |
| ७ | Rhymes & Stories – Part B | | |
| ८ | World Around Me – Part B | | |
| ९ | World Around Me Activity Book – Part B | | |
| १० | Cursive Writing – Part A | | |
| ११ | Shabd Gyan | | |
| १२ | Shabd Rachna | | |

| Sr. | Sr/ LKG – १२ पुस्तके | प्रमाण / नग | दर (GST) सह |
|---|---|---|---|
| १ | English Activity – Part C | | |
| २ | English Reader For Leaders – Part C | | |
| ३ | Little Artist- Part C | | |
| ४ | Math A Magic – Part C | | |
| ५ | Maths Activity – Part C | | |
| ६ | Rhymes & Stories – Part C | | |
| ७ | World Around Me – Part C | | |
| ८ | World Around Me Activity Book – Part C | | |
| ९ | Cursive Writing – Part C | | |
| १० | Math Table Book | | |
| ११ | Swar Rachna | | |
| १२ | Swary Gyan | | |

इच्छुक निविदाधारक/नोंदणीकृत संस्थांनी सदरचे दरपत्रक **दि. ०६/१०/२०२६ ते दि. १२/१०/२०२६ रोजी सायं. ४.०० वाजेपर्यंत** पनवेल महानगरपालिकेच्या **शिक्षण विभागाकडे, लोकनेते दि. बा. पाटील विद्यालय, दांडेकर हॉस्पिटल समोर, पनवेल** येथे समक्ष सादर करावे. व प्राप्त दरपत्रके शक्यतो दि.१२/१०/२०२६ रोजी सायं.४.०० नंतर उघडण्यात येतील. वरील दिनांकानंतर प्राप्त झालेली दरपत्रके विचारात घेतली जाणार नाहीत.

**अटी व शर्ती -**

१. नमूद केलेले दर हे सर्व प्रकारच्या वाहतूक खर्चासह समाविष्ट असावेत.
२. नमूद केलेले दर हे GST सह समाविष्ट असावेत.
३. इच्छुक निविदाधारक/संस्थांनी प्रत्येक घटकाचा बाजारभाव स्वतंत्रपणे व स्पष्टपणे नमूद करावा.
४. याकामी अधिकची माहिती हवी असल्यास शिक्षण विभाग, पनवेल महानगरपालिका यांच्याशी संपर्क साधावा.

सदर दरपत्रक हे केवळ **बाजारभाव निश्चित करण्याच्या उद्देशाने** मागविण्यात येत असून, त्याआधारे कोणतेही काम देण्याचे बंधन पनवेल महानगरपालिकेवर राहणार नाही.

सही/-
**उपायुक्त (शिक्षण)**
**पनवेल महानगरपालिका**

जा.क्र. पमपा/जनसंपर्क./३१२६/
प्र.क्र.३२१/३४२/२०२६
दिनांक : ०५/१०/२०२६

## भुमिसंपादन पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम २०१३ व महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम १२६ (३)

## शुध्दीपत्र

पनवेल महानगरपालिका हद्दीतील मौजे-नागझरी, ता. पनवेल, येथील स.नं.११ पासून ते मौजे-नागझरी, ता. पनवेल येथील स.नं. ४ पर्यंत या ३०.०० मी. रस्ता रुंदीकरण करणेकामी भुसंपादन कायदा भुमिसंपादन पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम २०१३ व महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम १२६ (३) अन्वये कलम १९ ची अधिसूचना दिनांक ११/०८/२०२६ रोजी उद्घोषित केलेली आहे. सदर अधिसूचनेमध्ये खालीलप्रमाणे शुध्दीपत्र प्रसिध्द करणेत येत आहे.

१) ३०.०० मीटर रस्ता रुंदीकरण ऐवजी ४५.०० मीटर
२) संपादनाचे क्षेत्र हे. आर.चौ.मी. ऐवजी हे.आर. असे वाचावे.

**दिनांक :- २१/०९/२०२६**
**ठिकाण :- पनवेल**

**सही/-**
**(पवन चांडक)**
**उप विभागीय अधिकारी पनवेल**
**उप विभाग पनवेल**

जिमाका/रायगड/जाहिरात/१७०/१३५६/२०२६

## रोहा अष्टमी नगर परिषद

ता-रोहा, जिल्हा-रायगड पिन कोड - ४०२१०९

फोन:- कार्यालय-०२१९४ २३५५२० फॅक्स: ०२१९४-२३४०८७

Email: rohanagarpalika@gmail.com,

क्र.रोनप/बांध/निविदा/१६७४/२०२६-२७ दिनांक-०५/१०/२०२६

**कोटेशन नोटिस**

रोहा अष्टमी नगर परिषदेद्वारे रोहा नगर परिषद हद्दीतील विविध विकास कामाच्या NON SSR ITEMS च्या विहित नमुन्यात दरपत्रक / कोटेशन मागविण्यात येत आहे. सदर कामाच्या NON SSR ITEMS च्या तपशिल रोहा नगर परिषद कार्यालयाच्या नोटिस बोर्डवर व नगर परिषदेच्या बांधकाम विभागात मंगळवार दिनांक ०६/१०/२०२६ सकाळी ११.०० वाजेपासून ते मंगळवार दिनांक १३/१०/२०२६ दुपारी ४.०० वाजेपर्यंत प्राप्त होतील. NON SSR ITEMS अंतर्भूत असलेल्या कामांचा तपशिल खालीलप्रमाणे.

| क्र. | कामाचा तपशिल |
|---|---|
| १. | रोहा अष्टमी नगर परिषद हद्दीतील प्रभाग क्रमांक ०९ श्री स्वामी समर्थ उद्यान दमखाडी येथे सुशोभीकरण करणे व ओपन जीम बसविणे. |

**सही/-**
**(अजमभार एडके)**
**मुख्याधिकारी**
**रोहा अष्टमी नगर परिषद**

**सही/-**
**(कु. वनश्री अवनी समीर शेडगे)**
**नगराध्यक्षा**
**रोहा अष्टमी नगर परिषद**

# महिला सक्षमीकरणासाठी पुढाकार

## पनवेल मनपाची विविध योजनांवर आढावा बैठक

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महानगरपालिकेच्या महिला व बालकल्याण विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांची प्रभावी अंमलबजावणी, योजनांमध्ये आवश्यक सुधारणा तसेच नवीन योजनांचे प्रस्ताव याबाबत सोमवारी (दि. ५) मुख्यालयात बैठक घेण्यात आली. महिला व बालकल्याण समितीच्या सभापती ममता म्हात्रे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या बैठकीत महिला व बालकांच्या शैक्षणिक, आर्थिक सक्षमीकरण आणि सामाजिक कल्याणाशी संबंधित विविध विषयांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. यावेळी महिला बालकल्याण समितीच्या सर्व सदस्या, महिला व बालकल्याण विभागप्रमुख किर्ती महाजन,



महापालिका अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

यावेळी ६५ वर्षांवरील पात्र ज्येष्ठ महिलांना उदरनिर्वाहासाठी अर्थसहाय्य करणे, मुलींची शाळा गळती रोखण्यासाठी उपस्थिती भत्ता व गुणवत्ता वाढीसाठी योजना, पनवेल महानगरपालिका क्षेत्रात महिला व बालकांसाठी स्वतंत्र व्यायामशाळा व क्रीडा सुविधा, अनाथ बालकांसाठी काम करणाऱ्या पात्र नोंदणीकृत संस्थांना अर्थसहाय्य, खांदेश्वर येथील बालग्राम वसतिगृहाला भेट देऊन चर्चा करणे, महिला बचत गटांना व्यवसायासाठी शिलाई मशीन, घरघंटी, पापड मशीन, मिरची कांडप मशीन, मसाला ग्राइंडर, शेवया मशीन आदींसाठी अर्थसहाय्य करणे, महिला उद्योजिका व्यापारी ग्राहक पेठेचे आयोजन करणे, महिलांसाठी आरोग्य शिबिराचे आयोजन करणे, महिला व बालकल्याण विभागांतर्गत योजनांची माहिती व जाहिरात देण्याबाबत कार्यवाही करणे, १० सप्टेंबर रोजी झालेल्या मागील बैठकीत चर्चेस आलेल्या विषयांवरील कार्यवाहीचा आढावा घेणे व सद्यस्थितीची माहिती सादर करणे अशा विविध विषयांवर चर्चा करण्यात आली.

महापालिका कार्यक्षेत्रातील महिला बचत गटाच्या महिलांना येत्या दिवाळी सणाच्या पार्श्वभूमीवर व्यापारी ग्राहक पेठ निर्माण करण्याच्या उद्देशाने बैठकीत चर्चा करण्यात आली. महापालिका कार्यक्षेत्रातील महिलांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्याच्या हेतूने प्रोत्साहनपर अनुदान देण्याबाबतही चर्चा करण्यात आली तसेच ऐनवेळी सभापतींच्या परवानगीने विविध विषयांवर चर्चा करण्यात आली.

# नेरुळमध्ये नमो सेवा पथनाट्य, स्वच्छता मोहीम

**नवी मुंबई : बातमीदार**

भारतीय जनता पार्टी नवी मुंबई जिल्ह्याच्या वतीने जिल्हाध्यक्ष राजेश पाटील यांच्या माध्यमातून सेवा संकल्प अभियानांतर्गत सहकार बाजार, सारसोळे बस डेपोशेजारी, नेरुळ येथे नमो सेवा पथनाट्य कार्यक्रम उत्साहात संपन्न झाला. पथनाट्याद्वारे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशासाठी केलेल्या कार्याची माहिती देण्यात आली. तसेच नेरुळ येथील शिरवणे विद्यालय व ज्युनिअर कॉलेज येथे स्वच्छता अभियानांतर्गत साफसफाई करण्यात आली.

कार्यक्रमादरम्यान राष्ट्रपिता महात्मा गांधी आणि लालबहादूर शास्त्री यांच्या प्रतिमांचे पूजन करण्यात आले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त



सेवा संकल्प अभियानांतर्गत हे कार्यक्रम घेण्यात आले. यावेळी भारतीय जनता पार्टी नवी मुंबई जिल्हाध्यक्ष राजेश पाटील, प्राचार्या भाग्यश्री चौधरी, माजी नगरसेविका शिल्पा कांबळी, राजेश सोंडकर, निनाद होनराव, नरेश भोईर, नरेश सुतार, राजेश पुजारी, शशी नेगी, शालेय शिक्षक, विद्यार्थी तसेच भाजपचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी राजेश पाटील यांनी सांगितले की, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या गुजरातमधील व देशामधील गेल्या २५ वर्षांतील कारकिर्दीचा आदर झाला पाहिजे. त्यासाठी राष्ट्रीय नेतृत्वाने देशभरात सेवा संकल्प अभियान राबवण्याची संकल्पना पुढे आणली आहे. त्याच अनुषंगाने नवी मुंबईत पथनाट्य सुरू केले आहे.

# एमएनएमच्या विद्यार्थ्यांची सीकेटीतील बॉटनिकल गार्डनला शैक्षणिक क्षेत्रभेट

**नवीन पनवेल : रामप्रहर वृत्त**

विद्यार्थ्यांना पाठ्यपुस्तकातील ज्ञानासोबतच प्रत्यक्ष अनुभवातून वनस्पतीविषयक माहिती मिळावी तसेच निसर्गाविषयी जिज्ञासा निर्माण व्हावी या उद्देशाने एमएनएम विद्यालय व टी.एन.जी. कनिष्ठ



विज्ञान विद्यालय, गव्हाण-कोपर येथील इयत्ता आठवीच्या विद्यार्थ्यांची सीकेटी विद्यालय, नवीन पनवेल येथील बॉटनिकल गार्डनला शैक्षणिक क्षेत्रभेट आयोजित करण्यात आली. या क्षेत्रभेटीचे आयोजन महाविद्यालयाचे प्राचार्य एस. के. पाटील यांच्या समन्वयातून करण्यात आले.

विद्यार्थ्यांनी बॉटनिकल गार्डनमधील विविध वनस्पतींचे प्रत्यक्ष निरीक्षण केले. वनस्पतींची रचना, विविध प्रकार तसेच त्यांचे शैक्षणिक व पर्यावरणीय महत्त्व याबाबत विद्यार्थ्यांना माहिती मिळाली. यावेळी प्राणीशास्त्र विभागाच्या स्नेहा तांडेल तसेच वनस्पतिशास्त्र विभागाच्या विभागप्रमुख आशा भगत यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करून वनस्पतीविषयक शास्त्रीय माहिती समजावून सांगितली. प्रत्यक्ष निरीक्षणामुळे विद्यार्थ्यांना अभ्यासक्रमातील संकल्पना अधिक स्पष्टपणे समजून घेण्यास मदत झाली. क्षेत्रभेटीचे आयोजन एमएनएम विद्यालयाच्या प्राचार्या सायली वडवलकर यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. क्षेत्रभेटीमुळे विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन, निरीक्षणशक्ती व पर्यावरणाविषयी जागरूकता वाढण्यास मदत झाली.

# उरणमध्ये महाराष्ट्र ओबीसी कृती समितीची कार्यकारिणी बैठक

## ३३ जातींना आरक्षण देण्याची मागणी

**उरण : बातमीदार**

महाराष्ट्रातील ३३ ओबीसी जाती व समाज समूहांचा केंद्राच्या केंद्रीय ओबीसी सूचीत समावेशाच्या मागणीसाठी कार्यरत महाराष्ट्र ओबीसी कृती समितीची कार्यकारिणी बैठक रविवारी (दि. ४) आनंदी हॉटेल, कोर्टनाका-उरण येथे कराडी समाजाच्या वतीने आयोजित करण्यात आली होती. यावेळी अध्यक्ष श्रावण फरकाडे यांनी मनोगत व्यक्त केले. न्याय न मिळाल्यास तीव्र आंदोलन छेडण्यात येईल. त्यासाठी सर्व ३३ जातींनी एकत्र येऊन लढा उभारावा, असे आवाहन त्यांनी यावेळी केले.

महाराष्ट्रात ३३ जातींना ओबीसी आरक्षण आहे, मात्र त्याच ३३ जातींना केंद्रात आरक्षण नाही. त्यामुळे केंद्रात समावेश न झालेल्या ३३ जातींचे आर्थिक, शैक्षणिक, सामाजिक नुकसान होत आहे. अनेक वर्षे महाराष्ट्र ओबीसी कृती समितीच्या माध्यमातून ३३ जातींना केंद्रानेही ओबीसी आरक्षण द्यावे यासाठी कायदेशीर व शांततेच्या मार्गाने लढा सुरू आहे. सर्वच पक्षांचे मंत्री, खासदार, आमदारांच्याही गाठीभेटी घेण्यात आल्या आहेत. बैठकीवेळी अंबाला लोकसभे (हरियाणा)चे खासदार अमन कुमार नागरा, भाजप कार्यकर्त्या पुष्पा नागरा, महाराष्ट्र ओबीसी कृती समितीचे अध्यक्ष श्रावण फरकाडे, कार्याध्यक्ष राम खरपूरिया लोधी, सचिव दीपक नेवे, संरक्षक नामदेव राऊत, माजी प्राचार्य पी. आर. बडगुजर, लेवा गुजर समाजाचे जी. एम. पाटील, प्रा. शालिक नेवारे, ॲड. मदन गोवारी आदी उपस्थित होते.

बैठकीत ओबीसींना केंद्राच्या



ओबीसी आरक्षणाचा लाभ मिळण्यासाठी सुरू असलेल्या पाठपुराव्याचा आढावा घेण्यात आला. केंद्र व राज्याकडे करण्यात आलेली निवेदने, बैठका, पत्रव्यवहार तसेच पुढील कार्यवाहीबाबत चर्चा करण्यात आली. केंद्राकडे पाठपुरावा करणे तसेच विविध ओबीसी समाज संघटनांमध्ये व्यापक जनजागृती करण्यासाठी पुढील दिशा निश्चित करण्यात आली. संबंधित समाजांना केंद्राच्या शैक्षणिक, सरकारी नोकऱ्या, शिष्यवृत्ती व इतर केंद्रस्तरीय योजनांमधील सुविधांचा लाभ मिळावा हा या प्रयत्नांचा प्रमुख उद्देश असल्याचे फरकाडे यांनी सांगितले. खासदार अमन कुमार नागरा यांनी ते ओबीसींच्या पाठीशी असल्याचे सांगत दिल्लीतील मंत्री व विविध विभागांतील सचिवांची भेट घडवून समाजाचे प्रश्न मार्गी लावू, असे सांगितले. बैठकीस विविध ओबीसी समाजाचे प्रतिनिधी, पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. कराडी समाजाच्या वतीने भोजनाची व्यवस्था करण्यात आली होती.

सूत्रसंचालन नितेश पंडित यांनी केले. बैठक यशस्वी करण्यासाठी अध्यक्ष महादेव बंडा, सचिव विलास पाटील, माजी अध्यक्ष ॲड. मदन गोवारी, पनवेल तालुका अध्यक्ष सूरदास गोवारी, खजिनदार मधुकर भगत, सहखजिनदार प्रल्हाद कासकर, पनवेल सचिव शिवदास पाटील, उरण अध्यक्ष रमण कासकर, सल्लागार शंकर भोईर, सभापती गणेश पाटील, सदस्य नरेश भोईर, हरिश्चंद्र पाटील, सुनील पाटील, आनंदी हॉटेलचे मालक चेतन भोईर, कराडी समाज संघटनेच्या पदाधिकारी व सदस्यांनी मेहनत घेतली.

# वक्तृत्व स्पर्धेत नमुंमपा शाळेतील विद्यार्थ्यांची बाजी

**नवी मुंबई : बातमीदार**

महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या बेलापूर-नेरूळ शाखेच्या वतीने आयोजित नववी शहीद भगतसिंग वक्तृत्व स्पर्धा सीबीडी बेलापूर येथील पीपल्स एज्युकेशन सोसायटीच्या सेंट्रल स्कूलमध्ये उत्साहात संपन्न झाली. विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन, सामाजिक जाणीव आणि निर्भीड विचारमांडणी विकसित व्हावी, या उद्देशाने आयोजित स्पर्धेत नवी मुंबईतील १२ शाळांमधील ५२ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

गेल्या आठ वर्षांपासून सुरू असलेल्या या उपक्रमाचे यंदा नववे वर्ष होते. यंदाच्या स्पर्धेसाठी 'समाजसुधारक महात्मा ज्योतिराव फुले, बुवाबाजी, ध्वनिप्रदूषणमुक्त सण, पर्यावरणपूरक विकास, शिक्षण आणि चवदार तळ्याचा समतेचा लढा' अशा विषयांवर विद्यार्थ्यांनी अभ्यासपूर्ण भाषणे सादर केली. सामाजिक प्रश्नांची जाण, आत्मविश्वासपूर्ण सादरीकरण आणि प्रभावी वक्तृत्वातून विद्यार्थ्यांनी आपल्या प्रतिभेची प्रचिती दिली. स्वतःचे विचार निर्भीडपणे व्यक्त करण्याची संधी या उपक्रमातून मिळाली.



यावेळी 'बुवाबाजी समाजाला लागलेली कीड' या विषयावर प्रभावी भाषण करत तुर्भे येथील नवी मुंबई महापालिका शाळा क्रमांक १०७चा विद्यार्थी पियुष चंद्रकांत हिप्परकर याने प्रथम क्रमांक पटकावला.

नेरूळ येथील पुणे विद्याभवनची प्रणाली कांबळे हिने द्वितीय, तर दिवाळे कोळीवाडा येथील मनपा शाळा क्रमांक ११७ चा प्रभातकुमार राई याने तृतीय क्रमांक मिळवला. गार्गी गोळे, स्नेहल साळुंखे आणि आंचल कालापाड यांना उत्तेजनार्थ पारितोषिके देण्यात आली. या कार्यक्रमाप्रसंगी विजेत्यांना पुस्तकांच्या स्वरूपात पारितोषिके, तर सर्व सहभागी विद्यार्थ्यांना प्रसिद्ध कवयित्री प्रज्ञा दया पवार यांच्या स्वाक्षरीची प्रमाणपत्रे देण्यात येणार आहेत.

परीक्षक म्हणून रमेश साळुंखे, विजय खरात, श्रद्धा जाधव, अर्चना शिंदे, संजय उबाळे आणि काळूराम जाधव यांनी काम पाहिले. विद्यार्थ्यांच्या विचारांना व्यासपीठ आणि अभिव्यक्तीला प्रोत्साहन देणारी ही स्पर्धा नव्या पिढीच्या वैचारिक जडणघडणीचा प्रेरणादायी उपक्रम ठरत असल्याचे मुख्याध्यापिका शोभा कुदळे यांनी यावेळी सांगितले.

# १३ ऑक्टोबरला कोकण विभागीय पेन्शन अदालत

**नवी मुंबई : बातमीदार**

कोकण विभागातील पेन्शन अदालत दरमहा दुसऱ्या मंगळवारी आयोजित करण्यात येते. या महिन्यातील विभागीय पेन्शन अदालत मंगळवार दि. १३ ऑक्टोबर रोजी दुपारी १२ वाजता कोकण भवनातील कक्ष क्रमांक १०६, सामान्य प्रशासन शाखा, विभागीय आयुक्त कार्यालय, कोकण भवन येथे आयोजित करण्यात आली आहे. पेन्शन अदालतीमध्ये महसूल विभागातील सेवानिवृत्त शासकीय कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित पेन्शन प्रकरणांच्या अडचणींचे निवारण करण्यात येणार आहे.

सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांच्या पेन्शन प्रकरणांबाबत तक्रारी असल्यास सदर दिवशी त्याबाबतचे अर्ज स्वीकारले जातील. कोकण विभागातील पेन्शनधारकांनी या पेन्शन अदालतीला उपस्थित राहून पेन्शनविषयी आपले प्रश्न उपस्थित करावेत, असे कोकण विभागाचे तहसीलदार (सामान्य प्रशासन) नरेश जगताप यांनी प्रसिद्धिपत्रकान्वये कळविले आहे.

# चिरनेर येथील कराओके स्पर्धेत अनिल पवार प्रथम

**उरण : प्रतिनिधी**

चिरनेर कातळपाडा येथील अंकुश परदेशी मित्र मंडळाच्या वतीने साखरचौथ गणेशोत्सवानिमित्त आयोजित कराओके हिंदी-मराठी गीत गायन स्पर्धेत चिरनेरच्या अनिल धनाजी पवार यांनी प्रथम क्रमांक पटकावला. आदिवासी समाजातील गायक अनिल पवार यांनी आपल्या गायनातून देशभक्तीपर गीत प्रभावीपणे सादर करून देशभक्तीचा जागर केला.

त्यांच्या गायनामुळे उपस्थित प्रेक्षकवर्ग भारावून गेला. त्यांना ११ हजार १११ रुपयांचे रोख पारितोषिक व आकर्षक सन्मानचिन्ह देऊन मंडळाच्या कार्यकर्त्यांच्या हस्ते गौरवण्यात आले. मानखुर्द येथील गायिका प्रिया मांजरेकर द्वितीय क्रमांकाची मानकरी ठरली. तिला पाच हजार ५५५ रुपयांचे रोख बक्षीस व सन्मानचिन्ह देण्यात आले. मोठेभोम येथील प्रांजल हरेश पाटील ही तृतीय क्रमांकाची मानकरी ठरली. तिला



दोन हजार २२२ रुपयांचे पारितोषिक व सन्मानचिन्ह देण्यात आले. अलिबागचा विक्रांत पाटील चतुर्थ क्रमांकाचा विजेता ठरला. त्याला एक हजार १११ रुपयांचे पारितोषिक व सन्मानचिन्ह देण्यात आले.

चिरनेरचा नरेश पाटील पाचव्या क्रमांकाचा मानकरी ठरला. त्यालाही एक हजार १११ रुपयांचे पारितोषिक व सन्मानचिन्ह देण्यात आले. स्पर्धेत मुंबई, नवी मुंबई, सांगली, उरण, पनवेल, पेण, अलिबाग येथील स्पर्धकांनी सहभाग घेऊन एकाहून एक सरस अशी हिंदी-मराठी गीते सादर करीत प्रेक्षकांना मंत्रमुग्ध केले.

# वीर वाजेकर महाविद्यालयात मतदार नोंदणी, जनजागृती कार्यक्रम

**उरण : बातमीदार, प्रतिनिधी, वार्ताहर**

रयत शिक्षण संस्थेच्या वीर वाजेकर महाविद्यालय, महालन विभाग फुंडे येथे शासन आपल्या दारी निमित्ताने मतदार नोंदणी व मतदार जनजागृती उपक्रम तहसीलदार उरण यांच्यामार्फत



घेण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व पाहुण्यांची ओळख करताना लोकशाही बळकट करण्यासाठी मतदार नोंदणी व योग्य उमेदवार निवडून देण्यासाठी जास्तीत जास्त मतदान करण्यासाठी नवमतदार होणाऱ्या विद्यार्थ्यांनी मोठ्या प्रमाणात जनजागृती करण्याचे आवाहन करण्यात आले.

नायब तहसीलदार प्रभाकर नवाले यांनी मतदार जागृती व मतदार नोंदणीविषयी तपशीलवार माहिती दिली. १८ वर्षे पूर्ण करणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांनी मतदार नोंदणी करावी. त्यासाठी फॉर्म कसा भरावा, जोडावी लागणारी कागदपत्रे, भरावयाची माहिती तसेच ऑनलाइन फॉर्म कसा भरावा याची सखोल माहिती दिली. महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी आपापल्या गावात मतदार नोंदणीसाठी जनजागृती करून लोकशाही बळकट करण्यासाठी हातभार लावावा, असे मार्गदर्शन केले.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्राचार्य डॉ. आमोद ठक्कर यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. विद्यार्थ्यांना मतदार नोंदणी फॉर्मचे वाटप करण्यात आले. कार्यक्रमास विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. यावेळी महसूल सहाय्यक शैख, प्राणिशास्त्र विभागाचे डॉ. राहुल पाटील, डॉ. जावळे आर. एस., डॉ. श्रेया पाटील उपस्थित होते. सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन प्रा. पंकज भोये यांनी केले.





# प्लीजंट स्कूलमध्ये वृक्षारोपण उपक्रम

**नवीन पनवेल : रामप्रहर वृत्त**

नेरेपाडा येथील लेट पंढरीनाथ माया खुटले शैक्षणिक, सामाजिक संस्था आणि लायन्स क्लब नवी मुंबई सामान्य, वाशी यांच्या वतीने प्लीजंट इंग्लिश स्कूल येथे वृक्षारोपण कार्यक्रम पार पडला. यावेळी सरपंच प्रकाश घाडगे, लायन्स क्लबचे अंकल साहा, मनोज शर्मा, पूजा शर्मा, शाळेचे संस्थापक अध्यक्ष धनंजय खुटले, मुख्याध्यापिका श्रद्धा ठाकूर, शाळेचे सर्व शिक्षक आणि विद्यार्थी उपस्थित होते. यावेळी शाळेच्या परिसरात वृक्षांची लागवड करण्यात आली आणि ती जगवण्याचे आश्वासन देण्यात आले.

# फरार आरोपीस अटक

**नवीन पनवेल** : ऑक्टोबर २०२५मध्ये २१ वर्षीय तरुणाच्या हत्येचा प्रयत्न करून पळून गेलेल्या आरोपीला पनवेल शहर पोलिसांनी ४ ऑक्टोबर रोजी अटक केली. राहुल साळुंखे (रा. शिवाजीनगर झोपडपट्टी, पनवेल) असे आरोपीचे नाव आहे.

ऑक्टोबर २०२५ मध्ये शकील मोहम्मद अयुब शेख याच्यावर सात ते आठ जणांनी दांडके, चॉपरने वार करून आरोपी पळून गेले होते. त्यानंतर पोलिसांनी तीन आरोपींना ताब्यात घेतले होते. त्यानंतर तब्बल वर्षभरानंतर राहुल साळुंखे याची गुप्त बातमीदाराकडून पनवेल शहर पोलिसांना माहिती मिळाली. वरिष्ठ पोलीस निरीक्षक बाळा कुंभार यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक अनंत परागे आणि त्यांच्या पथकाने आरोपीला पनवेल येथून ताब्यात घेऊन अटक केली. यातील आणखी आरोपींचा शोध पोलिसांकडून सुरू आहे.



# आगरी मंगलाष्टका पुस्तकाचे प्रकाशन

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

कवी, लेखक गजआनन म्हात्रे यांनी स्वप्रेरणेने लिहिलेल्या आगरी बोलीतील मंगलाष्टकांच्या 'आगरी मंगलाष्टका' पुस्तकाचे प्रकाशन वक्ते राजाराम पाटील यांच्या हस्ते शनिवारी करण्यात आले. आग्रोळी गावातील बी. टी. रणदिवे ग्रंथालय सभागृहात हा कार्यक्रम पार पडला.

रंगधनू प्रकाशनाच्या वतीने आयोजित या कार्यक्रमात ज्येष्ठ साहित्यिक प्रा. एल. बी. पाटील, ज्येष्ठ समाजसेवक नारायण मुकादम, समाजसेवक राजेश नामदेव पाटील, केतकी मुद्रालयाचे चंद्रकांत जाधव, ज्येष्ठ कवी खंडूजी अडांगळे उपस्थित होते. कार्यक्रमात आगरी धवलागीते, आगरी सटीगीते, आगरी मंगलाष्टके गायली गेली. यावेळी विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित होते.

# वाहने रस्त्यावर, पादचारी झुडपांतून; माणगावच्या वाहतूक कोंडीचे भीषण चित्र!

**माणगाव : प्रतिनिधी, बातमीदार**

माणगाव शहरातील वाहतूक कोंडीची समस्या रविवारी, ४ ऑक्टोबर रोजी सायंकाळी पुन्हा एकदा गंभीर स्वरूपात समोर आली. मुंबईच्या दिशेने जाणाऱ्या मार्गावर माणगाव शहरापासून थेट ढालघर फाट्यापर्यंत सुमारे सात किलोमीटरपर्यंत वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्याने संपूर्ण वाहतूक व्यवस्था अक्षरशः ठप्प झाल्याचे चित्र पाहायला मिळाले.

माणगाव शहराच्या प्रवेशद्वाराजवळ परिस्थिती आणखी बिकट झाली होती. एकाच लेनमध्ये वाहनांच्या अनेक रांगा लागल्याने वाहने अत्यंत संथगतीने पुढे सरकत होती. काही वाहनांना काही अंतर पार करण्यासाठीही बराच वेळ लागत होता. त्यामुळे वाहनचालक, प्रवासी, स्थानिक नागरिक आणि पादचारी यांना मोठ्या



त्रासाला सामोरे जावे लागले. वाहतूक कोंडी वाढत गेल्याने पादचाऱ्यांसाठी स्वतंत्रपणे चालण्याची जागाच उरली नाही. तीनचाकी, दुचाकी आणि छोट्या चारचाकी वाहनांनीही कोंडीतून पुढे जाण्यासाठी पादचारी मार्गाचा आधार घेतल्याचे अनेक ठिकाणी दिसून आले. काही ठिकाणी वाहने पदपथावरच उभी राहिल्याने पादचाऱ्यांसमोर आणखी मोठी अडचण निर्माण झाली.

वाहनांच्या गर्दीतून सुरक्षितपणे पुढे जाण्यासाठी जागा न मिळाल्याने स्थानिक पादचाऱ्यांना रस्त्याच्या कडेला असलेल्या दाट झाडी–झुडपांतून वाट काढत पुढे जावे लागले. वाहतूक व्यवस्थेची ही अवस्था पाहून नागरिकांच्या दैनंदिन हालअपेष्टांचे गांभीर्य स्पष्ट झाले. तासन्तास कोंडीत अडकलेल्या काही वाहनधारकांचा संयम अखेर सुटला. वाहने पुढे सरकत नसल्याने काहींनी वाहने रस्त्यावरच थांबवून पायी पुढील प्रवास सुरू केल्याचेही दृश्य दिसून आले. वाहनांच्या रांगा, सतत वाजणारे हॉर्न आणि कोंडीत अडकलेल्या नागरिकांची अस्वस्थता यामुळे संपूर्ण परिसरात तणावपूर्ण वातावरण निर्माण झाले होते.

रविवारचा दिवस, सलग सुट्ट्यांनंतर सुरू झालेला परतीचा प्रवास आणि मोठ्या प्रमाणात वाढलेली वाहनांची संख्या यामुळे माणगाव परिसरातील वाहतुकीवर मोठा ताण आला. त्यातच मुंबई–गोवा महामार्गावरील रखडलेली कामे आणि अपुऱ्या वाहतूक व्यवस्थेचा परिणाम पुन्हा एकदा जाणवला.माणगाव परिसरात वाहतूक कोंडीची समस्या नवीन नाही. मात्र, रस्त्यावर वाहनांना जागा नाही आणि पादचाऱ्यांना चालण्यासाठीही सुरक्षित मार्ग नाही, अशी परिस्थिती निर्माण होणे ही चिंतेची बाब आहे. आपत्कालीन परिस्थितीत रुग्णवाहिका, अग्निशमन वाहने किंवा इतर अत्यावश्यक सेवांची वाहने या कोंडीत अडकली तर त्याचे गंभीर परिणाम होऊ शकतात, अशी भीती नागरिकांकडून व्यक्त होत आहे.

माणगाव शहरातून मुंबईच्या दिशेने जाणाऱ्या मार्गावर निर्माण झालेल्या या अभूतपूर्व कोंडीने वाहतूक नियोजनाचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आणला आहे.

# खासदार सुनील तटकरेंच्या आदेशाने एमआयडीसी रस्त्यावरील पथदिवे उजळले

**नागोठणे : बातमीदार**



महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या नागोठण्यातील जलशुद्धीकरण केंद्राकडे जाणाऱ्या रस्त्यावरील बंद असलेले पथदिवे खासदार सुनील तटकरे यांच्या दणक्याने उजळले आहेत. संध्याकाळ पर्यंत पथदिवे सुरू करा आणि त्याचा निरोप मला लगेच पाठवा अशा शब्दात खासदार सुनील तटकरे यांनी एमआयडीसीच्या अधिकाऱ्यांना शनिवारी (दि.३) दुपारी ठणकावले होते. त्याची दखल घेत एमआयडीसीच्या अधिकाऱ्यांनी रस्त्यावरील पथदिवे तातडीने सुरू केले आहेत. पथदिवे सुरू झाल्याने नागरिकांनी खासदार सुनील तटकरे यांचे आभार मानले आहेत.

नागोठणे शुद्ध पाणीपुरवठा योजने संदर्भात नागोठणे ग्रामपंचायत कार्यालयातील नियोजित बैठकीपूर्वी फिल्टर प्लांटच्या ठिकाणी भेट देऊन तेथील वस्तुस्थिती जाणून घेण्यासाठी फिल्टर प्लांटकडे जात असताना एमआयडीसी रस्त्यावरील पथदिवे खूप कालावधीपासून बंद असल्याचे स्थानिक नागरिकांनी खासदार सुनील तटकरे यांच्या निदर्शनास आणून दिले. तसेच पथदिवे बंद असल्याने सकाळच्या वेळी या रस्त्यावर मॉर्निंग वॉक साठी जाणारे नागरिक, गुरे चरावयास येणारे शेतकरी, गुराखी, रस्त्यालगत असलेल्या आपल्या शेतावर जाणारे शेतकरी, महिला यांना दररोज पहाटेच्या वेळी तसेच सायंकाळी काळोखातून चालत जावे लागत होते.

या सर्व बाबी स्थानिक नागरिकांनी खासदार सुनील तटकरे यांच्या निदर्शनास आणून देताच त्यांनी एमआयडीसीच्या अधिकाऱ्यांना रस्त्यावरील पथदिवे तातडीने सुरू करण्याची तंबी दिली होती.

# लायन्स क्लब ऑफ सीबीडीतर्फे निराधार महिलांना धान्यवाटप

**पेण : प्रतिनिधी**

कै. मोरेश्वर भगत शैक्षणिक सामाजिक विकास संस्था खारपाडा येथे लायन्स क्लब ऑफ सीबीडी बेलापूर यांच्या वतीने खासदार सुनील तटकरे सभागृहात अध्यक्ष पौर्णिमा श्रीवास्तव यांच्या हस्ते अनाज दान कार्यक्रम संपन्न झाला.




यावेळी लायन्स क्लबचे पदाधिकारी सुदेसाना मंडळ, कोषाध्यक्ष सुषमा दळवी, विद्या दिपा मोरया, रमेश मोरया नेहा कदम पूनम वालीचा, उल्लास वडके, सुलाबा अनिल पोटे, कै.मोरेश्वर भगत शैक्षणिक संस्था अध्यक्ष रश्मी भगत, अपंग प्रहार संघटना अध्यक्ष भालचंद्र भगत, पेण विधानसभा महिला चिटणीस ललिता ठाकूर, संस्था सदस्य मेघा पाटील, सदस्य दर्शना ठाकूर उपस्थित होते.

यावेळी लायन्स क्लबच्या सदस्यांचा संस्थेमार्फत सत्कार करण्यात आला. तसेच निराधार महिलांना अनाज वाटप करण्यात आल्याबद्दल वाचनालय संस्थेचे अध्यक्ष दयानंद भगत ह्यांनी क्लबचे आभार मानले.

# मुरूड येथे नवरात्रोत्सव शांततेत पार पाडण्याचे आवाहन

**मुरुड : प्रतिनिधी**

मुरुड पोलिस ठाणेतर्फे आगामी नवरात्रोत्सवसणाच्या पार्श्वभूमीवर येथील दर्यासारंग सभागृहात तालुक्यांतील नवरात्रौत्सव मंडळ पदाधिकारी , सरपंच , उपसरपंच , पोलीस पाटील व शांतता समिती सदस्य आदींची बैठक मुरूड ठाण्याचेपोलिस निरीक्षक परशुराम कांबळे यांच्या अध्यक्षतेखाली अध्यक्षतेखालीनुकतीच पार पडली. यावेळी माजी प्राचार्य प्रा .विश्वास चव्हाण , कोटेश्वरी देवस्थान उपाध्यक्ष मनोहर गुरव , नारायण पटेल , नगसेविका नगमाना खानजादे , जिल्हा शांतता समिती सदस्य राशिद फहीम, श्रीकांत सुर्वे ,मनसे जिल्हा उपाध्यक्ष शैलेश खोत , एकदरा हनुमान मच्छिमार संस्थेचे अध्यक्ष पांडुरग आगरकर , चिंतामणी लोदी , वासंती उमरोटकर , प्रा . मेघराज जाधव आदी मान्यवर उपस्थित होते . मुरुड पोलिस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरिक्षक परशुराम कांबळे यांनी तालुक्यातील नागरिकांनी पोलिस यंत्रणेलामोलाची साथ देऊन गणेशोत्सव अत्यंत शांततेत पार पडल्या बद्दलसर्वांना मनःपूर्वक धन्यवाद दिले . नवरात्रोत्सव मंडळे मुरुड तालुक्यात ६३ असून सर्व पदाधिकाऱ्यांनी देवी प्रतिष्ठापने पासून विसर्जना दरम्यान सतर्क राहून अनुचित प्रकार होऊ नये .जेणेकरून उत्सवाला गालबोट लागणार नाही यासाठी मंडळांनी खबरदारी घ्यावी.




## पनवेल महानगरपालिका

ता. पनवेल, जि. रायगड पनवेल ४१० २०६

कार्यालय : २७४५८०४०/४१/४२ फॅक्स नं. : ०२२–२७४५२२३३

Email: panvelcorporation@gmail.com

जा.क्र. पमपा/सा.प्र.वि/२१–२६/प्र.क्र २३/३२०/२०२६ दिनांक : ०५/१०/२०२६

### जाहिर निविदा सुचना

आपल्या देशाचे माननीय पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदी यांच्या संविधानिक पदावरील करकीर्दीला २५ वर्षे पुर्ण झाल्यानिमित्त त्यांच्या सेवा कार्याचा लाभ सामान्य नागरिकांपर्यंत पोहचविण्याच्या उद्देशाने त्यांच्या वाढदिवसानिमित्त दिनांक १७ सप्टेंबर, २०२६ ते १७ ऑक्टोबर, २०२६ या कालावधीत राज्यात "सेवा संकल्प अभियान" राबविण्याबाबत खालील नमुद उपक्रमांचे आयोजन करणेकरीता ठेकेदाराची / संस्थेची नियुक्ती करणे कामी इच्छूक संस्था/पुरवठा धारक यांचे कडून रोजी खालील नमुद केलेल्या तपशिला नुसार दर पत्रके मागविणेंत येत आहे. सदरचे कार्यक्रम दि. १५/१०/२०२६ रोजी आयोजित करण्याचे आहेत.

| अ.क्र. | कामाचे स्वरुप |
|---|---|
| १ | ७ स्टॉल उभारणी व व्यवस्थापन |
| २ | चित्रकला व निबंध स्पर्धा आयोजन (नागरीकांसाठी) |
| ३ | रांगोळी स्पर्धा आयोजन (नागरीकांसाठी) |
| ४ | बाईक रॅली आयोजन (नागरीकांसाठी) |
| ५ | व्याख्याने |

तरी वरील उपक्रमांतील सविस्तर माहिती व कामाच्या अटी शर्ती सामान्य प्रशासन विभागात कार्यालयीन वेळेत उपलब्ध करण्यात येतील. तसेच इच्छुकांनी सदरची दरपत्रके दि. ११/१०/२०२६ रोजी दुपारी ३.३० वाजे पर्यंत महापालिकेच्या सामान्य प्रशासन विभागाकडे सादर करावीत. प्राप्त झालेली दरपत्रके त्याच दिवशी दुपारी ३.४५ वाजता मा.उपायुक्त (मुख्यालय) यांचे दालनात उघडण्यात येतील. या कामाच्या बाबत अधिक माहितीसाठी सामान्य प्रशासन विभागाशी संपर्क साधावा.

जा.क्र. पमपा/जनसंपर्क./३१२६/
प्र.क्र.३२३/३४४/२०२६
दिनांक : ०५/१०/२०२६

सही/–
(कैलास गावडे)
उपायुक्त (मुख्यालय)
पनवेल महानगरपालिका


# लायन्स क्लबच्या सेवा सप्ताहात विद्यार्थ्यांना सायबर सुरक्षेचा कानमंत्र

**नागोठणे : बातमीदार**

सोशल मीडिया आणि इंटरनेटच्या वाढत्या वापरामुळे सायबर गुन्ह्यांचे प्रमाण वाढत असून, विद्यार्थ्यांनी मोबाईल व सोशल मीडियाचा वापर अत्यंत सावधगिरीने करावा, अनोळखी व्यक्तींच्या फ्रेंड रिक्वेस्ट स्वीकारू नका, त्यांच्याशी चॅटिंग करू नका तसेच कोणालाही ओटीपी देऊ नका, असा महत्त्वपूर्ण सल्ला नवी मुंबईचे पोलीस उपनिरीक्षक प्रमोद कदम यांनी दिला.

नागोठणे लायन्स क्लबच्या वतीने आयोजित सेवा सप्ताह (१ ते ८ ऑक्टोबर) अंतर्गत सोमवार दि. ५ ऑक्टोबर रोजी सकाळी ११ वाजता नागोठणे उर्दू हायस्कूल व ज्युनिअर कॉलेजच्या सभागृहात विद्यार्थ्यांसाठी सायबर क्राईम संदर्भात मार्गदर्शन शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी पोलीस उपनिरीक्षक प्रमोद कदम यांनी विद्यार्थ्यांनी सायबर



गुन्हे, सोशल मीडिया वापर, ऑनलाइन फसवणूक आणि मोबाईल सुरक्षेबाबत अत्यंत मोलाचे मार्गदर्शन केले.

यावेळी नागोठणे लायन्स क्लबचे अध्यक्ष लायन विलास चौलकर, नागोठणे एज्युकेशन सोसायटीचे जनरल सेक्रेटरी लियाकतकशेठ कडवेकर, लायन प्रकाश जैन, लायन यशवंत चित्रे, लायन डॉ. अनिल गिते, लायन विजय शहासने, लायन सखाराम ताडकर, लायन दीपक गायकवाड, लायन पांडुरंग शिंदे, लायन संतोष शहासने, लायन विशाल शिंदे, लायन सिद्धेश काळे, लायन विद्या म्हात्रे यांच्यासह उर्दू हायस्कूल व ज्युनिअर कॉलेजचे शिक्षक तसेच विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

मित्र आधार देणारा असावा, फसवणूक करणारा नसावा, असे सांगताना पोलिस उपनिरीक्षक प्रमोद कदम यांनी फेसबुक, इन्स्टाग्राम यांसारख्या सोशल मीडिया माध्यमांचा वापर चांगल्या आणि विधायक कामांसाठी करण्याचे आवाहन केले. अनोळखी व्यक्तींशी ऑनलाइन मैत्री करताना सावध राहा. वैयक्तिक माहिती, फोटो किंवा संवेदनशील माहिती कुणाशीही शेअर करू नका, असेही त्यांनी स्पष्ट केले.

मोबाईल किंवा इंटरनेटवर गेम खेळताना स्वतःचे अथवा आई–वडिलांचे बँक अकाउंट, पासवर्ड किंवा इतर आर्थिक माहिती देऊ नका. '१, २, ३, ४', जन्मतारीख, वाहन क्रमांक अशा सहज ओळखता येणाऱ्या क्रमांकांचा पासवर्ड म्हणून वापर करू नका आणि पासवर्ड वेळोवेळी बदलत राहा,

अश्लील फोटो किंवा व्हिडिओच्या माध्यमातून ब्लॅकमेलिंग करून अनेकांची फसवणूक केली जाते. त्यामुळे अशा प्रकारच्या फोटो–व्हिडिओपासून दूर राहा. अश्लील फोटो किंवा व्हिडिओ फॉरवर्ड करणे हा गुन्हा आहे, याची विद्यार्थ्यांनी जाणीव ठेवावी, अशा प्रकारच्या घटनांमुळे अनेकांचे आयुष्य उद्ध्वस्त झाले आहे. आपले आयुष्य सुंदर आहे, त्यामुळे सुंदर जीवन जगा,असा भावनिक संदेशही दिला.

# रोहेकर माहेरवाशिणींचा मेळावा उत्साहात

**रोहा : प्रतिनिधी**

रोहा येथे जन्म व शिक्षण घेतलेल्या व नोकरी निमित्त निरनिराळ्या ठिकाणी गेलेल्या येथिल महिला ४ ऑक्टोबर रोजी ज्येष्ठ नागरिक सभागृहात एकत्र जमल्या होत्या. एकमेकांच्या कुटुंबाची विचारपूस, सद्दपरिस्थिती व एकत्र जमून शाळेतील आठवणी, शहरातील निरनिराळे कार्यक्रम, झालेले बदल यांच्या आठवणीनांना उजाळा देण्यात आला. दिवसभर खेळ, मनोरंजनाचे कार्यक्रम यामुळे उत्साह होता.ठाणे, मुंबई, पुणे, कोल्हापूर, महाबळेश्वर, चिपळूण तसेच रायगड जिल्हा व रोह्याच्या स्थानिक ७० महिला या कार्यक्रमात सहभागी झाल्या होत्या.

यावेळी नगराध्यक्षा वनश्री समीर शेडगे यांचा माहेरवाशिर्णीनी उत्कृष्ठ पोशाख ,श्रीफळ व पुष्पगुच्छ प्रदान करून यथोचित सत्कार केला.या वेळी नगराध्यक्षा कु. वनश्री शेडगे म्हणाल्या आपल्या रोह्यात विविध विकास कामे करून कायापालट करावयाचा आहे. मला विकासकामे करण्यासाठी ऊर्जा व आपल्या सर्वांचे आशीर्वाद मिळतील ही खात्री आहे. पुढील माहेरवासीणांचा मेळावा आमच्या वनश्री शेडगे फ़ार्म हाऊसवर घ्यावा अशी माझी इच्छा आहे. आणि हे निमंत्रण आपण स्विकाराल अशी खात्री आहे.

प्रास्ताविक सिमा गांगल यांनी केले. कार्यक्रमाचे नियोजन साधना गांगलआणि ज्योती तेंडुलकर यांनी केले.





## महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ

(महाराष्ट्र शासन अंगिकृत)

### मुदतवाढ सूचना

**ई निविदा सूचना क्र. ३१/२०२६-२०२७ (मुंबई) करीता**

दिनांक ११/०९/२०२६ रोजी दैनिक नवराष्ट्र, मुंबई, दैनिक मिड डे, मुंबई, दैनिक रामप्रहर, रायगड या वृत्तपत्रामध्ये प्रसिद्ध झालेल्या वरील ई निविदा सूचनेतील खालील कामांकरीता ई निविदा शासनाच्या https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्याबाबत मुदतवाढ सूचना देण्यात येत आहे.

| अ. क्र. | कामाचे नांव | अंदाजित रक्कम |
|---|---|---|
| १. | महाड औद्योगिक क्षेत्रातील पाणीपुरवठा योजनेची देखभाल व दुरूस्ती... पोलादपूर येथील सावित्री धरणावर आवश्यक उपकरणांसह पूर्वसूचना प्रणालीचा पुरवठा करून, बसविणे व चाचणी घेऊन कार्यान्वित करणे. | ₹ ३९,९५,३१४.०० |
| २. | अतिरिक्त महाड व पंचतारांकित औद्योगिक क्षेत्रातील सांडपाणी निःसारण योजनेची देखभाल व दुरूस्ती....महाड येथे वितरण ट्रान्सफॉर्मरसह डीपी स्ट्रक्चरचा पुरवठा करून उभारणे व कार्यान्वित करणे. | ₹ १६,१५,४८३.०० |

उपरोक्त कामांबाबत निविदा प्रपत्र दिनांक १५/१०/२०२६ पर्यंत https://mahatenders.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध असतील.

ज्या निविदाधारकांनी यापूर्वी आपली निविदा भरली असेल अथवा अपलोड केली असेल, त्यांनी निविदेमध्ये बदल करुन किंवा बदल न करता सदर निविदा पुन्हा भरणे आवश्यक आहे, याची कृपया नोंद घ्यावी, अशा कंत्राटदारांनी शुद्धिपत्रकानंतर जर निविदा पुन्हा भरली नाही अथवा अपलोड केली नाही तर त्यांचा देकार सदर स्पर्धात्मक निविदेतून आपोआप बाद होईल.

सदर निविदा सूचनेत इतर कोणताही बदल करण्यात आलेला नाही.

## हाँगकाँग सिक्सेस स्पर्धेसाठी
# भारतीय संघ जाहीर
### भुवनेश्वर कुमार करणार नेतृत्व

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

यंदाच्या हाँगकाँग सिक्सेस स्पर्धेसाठी भारतीय संघ निश्चित झाला आहे. ३० ऑक्टोबर ते १ नोव्हेंबरदरम्यान होणाऱ्या या स्पर्धेसाठी आयपीएल स्टार्सनी सजलेल्या भारतीय संघाची घोषणा करण्यात आली आहे. अनुभवी गोलंदाज या स्पर्धेसाठी संघाचे नेतृत्व करणार आहे.

क्रिकेटच्या सर्वात वेगवान आणि मनोरंजक फॉरमॅटपैकी एक असलेल्या हाँगकाँग सिक्सेसमध्ये मैदानावर फक्त सहा खेळाडू असतात. त्यामुळे फलंदाजांना किंवा गोलंदाजांना लय पकडण्यासाठी फारसा वेळ मिळत नाही आणि प्रत्येक क्षण महत्त्वाचा ठरतो.

भारतीय संघात भुवनेश्वर कुमारसह क्रुणाल पांड्या, शशांक सिंह, राहुल तेवतिया, नितीश राणा, राहुल त्रिपाठी आणि टी. नटराजन यांचा समावेश आहे. शशांक वगळता



या संघातील सर्व खेळाडूंनी भारताचे प्रतिनिधित्व केले आहे.

भारताने हाँगकाँग सिक्सेस स्पर्धा केवळ एकदाच जिंकली आहे. रॉबिन सिंग यांच्या नेतृत्वाखाली २००५मध्ये भारताने ही कामगिरी केली होती. त्याव्यतिरिक्त भारत १९९२ आणि १९९६मध्ये अंतिम फेरीत पोहचला होता, मात्र तिथे त्यांना पराभवाचा सामना करावा लागला.

**रंगतदार फॉरमॅट**

✻ हाँगकाँग सिक्सेस स्पर्धेत प्रत्येक संघात सहा खेळाडू असतात आणि प्रत्येक डावात केवळ सहा षटके असतात. यष्टिरक्षक वगळता इतर पाच खेळाडू गोलंदाजी करतात. यात एक खेळाडू दोन षटके (पण सलग नाही) टाकू शकतो, तर उर्वरित चार खेळाडू प्रत्येकी एक षटक टाकतात.

✻ जर एखाद्या फलंदाजाने अर्धशतक पूर्ण केले, तर त्याला 'रिटायर' व्हावे लागते, मात्र खालच्या क्रमांकाचे फलंदाज बाद झाल्यास किंवा 'रिटायर' झाल्यास तो पुन्हा फलंदाजीसाठी येऊ शकतो. जर पाच बळी (विकेट्स) पडले, तर शेवटचा उरलेला फलंदाज एकटाच खेळत राहतो.

✻ या स्पर्धेत वाइड किंवा नो-बॉलसाठी अतिरिक्त धावा दिल्या जातात, पण नो-बॉलवर फ्री-हिट मिळत नाही. हा सामना ४५ मिनिटांत संपतो. २०२४ पासून सहभागी १२ संघांची चार गटांत विभागणी करण्यात आली असून, प्रत्येक गटात तीन संघांचा समावेश आहे.

## भारत-विंडीज यांच्यात आता टी-२०चा थरार
### पहिली लढत आज लखनऊमध्ये रंगणार



**लखनऊ : वृत्तसंस्था**

शुबमन गिलच्या नेतृत्वाखालील भारतीय संघाने वेस्ट इंडिजविरुद्धची एकदिवसीय मालिका २-१ने जिंकली. आता मंगळवार (दि.६)पासून भारतीय संघ पाच टी-२० सामन्यांच्या मालिकेत भारतीय संघाचा सामना करण्यासाठी मैदानात उतरणार आहे.

भारत आणि वेस्ट इंडिज यांच्यातील पहिला टी-२० सामना लखनौच्या इकाना क्रिकेट स्टेडियमवर खेळवला जाणार आहे. सामना संध्याकाळी ७ वाजता सुरू होणार असून स्टार स्पोर्ट्सवर लाईव्ह पाहता येईल. मालिकेचे सामने हॉटस्टारवर लाईव्हवरही दर्शक पाहू शकतात.

याआधी भारत आणि वेस्ट इंडिज या दोन्ही संघांमध्ये पार पडलेल्या वनडे मालिकेत भारतीय संघाचा बोलबाला पाहायला मिळाला. मालिकेतील पहिल्या सामन्यात भारतीय संघाने आठ गडी राखून विजय मिळवला. त्यानंतर झालेल्या दुसऱ्या वनडे सामन्यातही भारतीय संघाने आठ गडी राखून विजय मिळवला. तिसऱ्या सामन्यात वेस्ट इंडिजने दमदार पुनरागमन केले. हा सामना त्यांनी पाच गडी राखून आपल्या नावावर केला, पण भारतीय संघाने ही मालिका २-१ने आपल्या नावावर केली. आता उभय संघांमध्ये टी-२०चा थरार रंगेल.

विशेष म्हणजे, वेस्ट इंडिजविरुद्धची टी-२० मालिका संपताच भारतीय संघ न्यूझीलंड दौऱ्यासाठी रवाना होणार आहे. तेथेही भारताला पाच सामन्यांची टी-२० मालिका खेळायची आहे. त्यामुळे भारतीय संघ पुढचे २६ दिवस तब्बल १० टी-२० सामने खेळणार आहे.

## विंडसर्फिंग आशियाई चॅम्पियनशिपमध्ये उरणच्या प्रियांशी पाटीलला कांस्यपदक
### ■ नगरसेवक परेश ठाकूर यांनी केले कौतुक

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

उरण येथील विंडसर्फिंग खेळाडू प्रियांशी मयूर पाटील हिने मलेशियात झालेल्या आशियाई चॅम्पियनशीपमध्ये अंडर-१७ गटात कांस्यपदक जिंकले. यासह तिची दक्षिण आफ्रिकेत होणाऱ्या युथ ऑलिम्पिकसाठी निवड झाली आहे. याबद्दल रामशेठ ठाकूर स्पोर्ट्स कॉम्प्लेक्सचे चेअरमन आणि मॅनेजिंग डायरेक्टर तथा पनवेल महानगरपालिकेचे नगरसेवक परेश ठाकूर यांनी प्रियांशीचे अभिनंदन केले.

उरण केगाव दांडा येथे राहणारी प्रियांशी पाटील ही बोरी येथील रोटरी इंग्लिश मीडियम हायस्कूल अ‍ॅण्ड ज्युनिअर के.जी. कॉलेजमध्ये इयत्ता नववीत शिकत आहे. विविध समुद्री परिस्थितीमध्ये नौकानयनाचा अनुभव असलेली प्रियांशी टेक्नो २९३ प्रकारात राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर भारताचे प्रतिनिधित्व करते. सिंगापूर, थायलंड, तुर्की, पोलंड आणि मलेशिया




यासह विविध देशांमध्ये झालेल्या स्पर्धांमध्ये तिने सहभाग नोंदवला आहे.

आशियाई चॅम्पियनशीपमध्ये कांस्यपदक आणि युवा ऑलिम्पिक स्पर्धेसाठी निवड झाल्याबद्दल नगरसेवक परेश ठाकूर यांनी प्रियांशीचे कौतुक करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

## आर्यवीर सेहवागकडे दिल्ली संघाची धुरा



**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

वीरेंद्र सेहवागचा १८ वर्षांचा मुलगा आर्यवीर सेहवाग याची विनू मंकड ट्रॉफीसाठी दिल्लीच्या १९-वर्षांखालील क्रिकेट संघाचा कर्णधार म्हणून त्याची नियुक्ती करण्यात आली आहे. दिल्ली अँड डिस्ट्रिक्ट क्रिकेट असोसिएशनने या स्पर्धेसाठी १६ सदस्यांच्या संघाची घोषणा केली आहे.

याआधी आर्यवीरने नुकताच भारताच्या १९-वर्षांखालील संघासाठी आपला पहिला सामना खेळला. गेल्या महिन्यात राजकोट येथे ऑस्ट्रेलियाविरुद्ध झालेल्या एकदिवसीय मालिकेसाठी तो भारतीय संघाचा भाग होता. आपल्या पहिल्याच सामन्यात त्याने २६ चेंडूंत २८ धावा केल्या आणि पावसाचा व्यत्यय आलेल्या त्या रोमांचक सामन्यात भारताने ऑस्ट्रेलियाचा सात धावांनी पराभव केला. तीन सामन्यांच्या मालिकेत त्याने एकूण १०९ धावा केल्या. दरम्यान, विनू मंकड चषक स्पर्धेतील सामने ८ ऑक्टोबरपासून विशाखापट्टणम येथे सुरू होणार आहेत.

## ऑस्ट्रेलियाविरुद्ध सूर्यांश शेडगेला संधी

**मुंबई : प्रतिनिधी**

ऑस्ट्रेलिया 'अ' संघाविरुद्ध होणाऱ्या तीन सामन्यांच्या एकदिवसीय (वनडे) मालिकेतून भारताचा स्टार अष्टपैलू खेळाडू हार्दिक पांड्या दुखापतीमुळे बाहेर पडला आहे. पांड्याच्या जागी मुंबईचा २३ वर्षीय युवा ऑलराउंडर सूर्यांश शेडगेचा 'इंडिया अ' संघात समावेश करण्यात आला आहे. ही एकदिवसीय मालिका मंगळवार (दि.६)पासून पुडुचेरी येथे खेळवली जाणार आहे.

पांड्याला उजव्या पायाच्या नडगीच्या हाडाशी संबंधित (राइट मेडियल टिबियल स्ट्रेस सिंड्रोम) त्रास होत असल्याचे वैद्यकीय तपासणीत आणि एमआरआय अहवालात उघड झाले आहे. त्यामुळे डॉक्टरांनी त्याला सहा ते आठ आठवडे विश्रांतीचा सल्ला दिला आहे. दुसरीकडे, सूर्यांश शेडगेने बंगळुरू येथील बीसीसीआय सेंटर ऑफ एक्सलन्समध्ये फिटनेस टेस्ट यशस्वीरीत्या पार पाडली आणि तो पुडुचेरी येथे संघात दाखल झाला आहे.

## जिल्हास्तरीय जलतरण स्पर्धेत सांची मुंडेची सुवर्ण हॅट्ट्रिक

**माणगाव : प्रतिनिधी**

माणगाव येथील अशोकदादा साबळे विद्यालय व ज्युनिअर कॉलेजची विद्यार्थिनी सांची शिवशंकर मुंडे हिने जिल्हास्तरीय जलतरण स्पर्धेत तीन सुवर्णपदकांवर आपले नाव कोरले. तिच्या या शानदार कामगिरीमुळे माणगावच्या क्रीडा क्षेत्रात आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला आहे.

महाराष्ट्र राज्य क्रीडा व युवक सेवा संचालनालय अंतर्गत शालेय जिल्हास्तरीय जलतरण क्रीडा स्पर्धा नुकतीच माणगावमधील बी.टी. स्पोर्ट्स अकादमी व मातोश्री गंगुबाई संभाजी शिंदे सीबीएसई स्कूल येथे झाली. रायगड जिल्ह्यातील विविध तालुक्यांतून सुमारे २०० जलतरणपटू विद्यार्थी-

### विभागीय स्पर्धेसाठी निवड




विद्यार्थिनींनी या स्पर्धेत सहभाग घेतला. १९ वर्षांखालील मुलींच्या गटात सांची मुंडे हिने फ्रीस्टाईलच्या १०० मीटर, ४०० मीटर आणि ८०० मीटर अशा तिन्ही प्रकारांत दमदार कामगिरी करून सुवर्णपदक जिंकले.

सांची सध्या इयत्ता बारावी विज्ञान शाखेत शिक्षण घेत असून शिक्षणासोबतच जलतरणाचा सराव अत्यंत शिस्तबद्ध पद्धतीने करत आहे. या उल्लेखनीय कामगिरीमुळे मुंबई येथे होणाऱ्या विभागीय स्तरावरील जलतरण स्पर्धेसाठी तिची निवड झाली आहे. ती बी.टी. स्पोर्ट्स अकादमीमध्ये आंतरराष्ट्रीय जलतरणपटू आरती दळवी व अभिनंदन दळवी यांच्या मार्गदर्शनाखाली प्रशिक्षण घेत आहे.

या देदीप्यमान यशाबद्दल माणगाव शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष अ‍ॅड. राजीव साबळे, स्कूल कमिटी चेअरमन नरेंद्र गायकवाड, संस्थेचे सदस्य आमदार अनिकेत तटकरे, नितीन बामगुडे, डॉ. आबासाहेब पाटणकर, अ‍ॅड. विनोद घायाळ व सर्व सदस्य तसेच अशोकदादा साबळे विद्यालय व ज्युनिअर कॉलेजचे प्राचार्य उभारे, उपप्राचार्य बिरादार, सोनावणे, पर्यवेक्षिका पुराणिक यांच्यासह शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थ्यांनी सांचीचे अभिनंदन केले. त्याचप्रमाणे क्रीडाशिक्षक डॉ. सुनील रावळे, दळवी यांनाही शुभेच्छा दिल्या.

## जिल्हास्तरीय शालेय सॉफ्ट टेनिस स्पर्धा उत्साहात

**खारघर : रामप्रहर वृत्त**

पनवेल महानगरपालिका जिल्हास्तरीय शालेय सॉफ्ट टेनिस स्पर्धा सोमवारी (दि.५) खारघर येथील रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूल येथे उत्साहपूर्ण व खेळीमेळीच्या वातावरणात झाली. या स्पर्धेत महापालिका क्षेत्रातील विविध शाळांमधील विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.



स्पर्धेमध्ये रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूल खारघर, विश्वज्योत हायस्कूल खारघर, बालभारती पब्लिक स्कूल खारघर, विबग्योर स्कूल खारघर, सुधागड स्कूल कळंबोली, आगरी शिक्षण संस्था खांदा कॉलनी, एस.डी. भगत स्कूल कळंबोली, न्यू इंग्लिश स्कूल तटकरे कळंबोली, महात्मा स्कूल खांदा कॉलनी आणि केईएस स्कूल पनवेल या शाळांतील खेळाडूंनी सहभाग नोंदविला.

स्पर्धेच्या यशस्वी आयोजनासाठी रायगड सॉफ्ट टेनिस असोसिएशनचे सचिव स्वप्नील वारंगे यांचे विशेष मार्गदर्शन लाभले तसेच राष्ट्रीय खेळाडू व राज्य पंच प्रतीक्षा शेरकर, काजल मंडल आणि विशाल खुटवड यांनी पंच म्हणून महत्त्वाची भूमिका बजावली.

याशिवाय एस.एन.जी. इंटरनॅशनल स्कूल उलवेचे क्रीडा शिक्षक शैलेश पाटील, रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूलचे क्रीडा शिक्षक अपूर्व अगरवाल आणि न्यू होरायझन स्कूलचे क्रीडा शिक्षक अरुण घेमुड यांचे मोलाचे सहकार्य व मार्गदर्शन लाभले. पनवेल महापालिका क्रीडा समन्वयक समीर रेवाळे यांचेही स्पर्धेच्या नियोजनासाठी विशेष सहकार्य लाभले.

सर्व सहभागी शाळांचे क्रीडा शिक्षक, खेळाडू, पंच, आयोजक, स्वयंसेवक तसेच रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूल खारघर यांच्या व्यवस्थापनाचे आयोजकांच्या वतीने आभार मानण्यात आले.

## एबी डिव्हिलियर्सची तुफानी खेळी



**शारजाह : वृत्तसंस्था**

दक्षिण आफ्रिकेचा माजी कर्णधार आणि दिग्गज फलंदाज एबी डिव्हिलियर्सने व्यावसायिक क्रिकेटमधून पूर्णपणे निवृत्ती घेऊन काही वर्षे उलटली असली, तरी त्याची स्फोटक फलंदाजी आजही तितकीच आक्रमक आहे. संयुक्त अरब अमिराती (यूएई)मधील शारजाह येथे आयोजित वर्ल्ड चॅम्पियनशिप ऑफ लेजेंड्स स्पर्धेत वेस्ट इंडिज चॅम्पियन्सविरुद्धच्या सामन्यात डिव्हिलियर्सने ३९ चेंडूंत ७० धावांची तुफानी खेळी करत चाहत्यांना थक्क केले.

स्पर्धेतील पहिल्याच सामन्यात दक्षिण आफ्रिका चॅम्पियन्स आणि वेस्ट इंडिज चॅम्पियन्स संघ आमनेसामने आले होते. आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये वेस्ट इंडीजच्या गोलंदाजांवर वर्चस्व गाजवणाऱ्या डिव्हिलियर्सने निवृत्तीनंतरही तोच धडाका कायम ठेवला.

दक्षिण आफ्रिकेचा हा अनुभवी दिग्गज फलंदाज डावाच्या शेवटच्या षटकात बाद झाला. बाद होण्यापूर्वी त्याने ३९ चेंडूंत पाच टोलेजंग षटकार आणि चार चौकारांच्या मदतीने ७० धावांची महत्त्वपूर्ण खेळी साकारली. वयाच्या ४२व्या वर्षीही डिव्हिलियर्सने दाखवलेल्या या उत्कृष्ट कामगिरीमुळे स्टेडियममधील प्रेक्षकांचे तुफान मनोरंजन झाले असून सर्वत्र त्याचे कौतुक होत आहे.







दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **-मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अ‍ॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com